# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०६ मार्च, २०२० / फाल्गुन १६, १९४१ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |
| **(३) अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** | |
| **(४) शालेय शिक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** | |
| **(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(७) परिवहन, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(८) पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७३**

---

### उच्च माध्यमिक शाळेतील वाढीव पदांना अनुदान देण्याबाबत

**(१) * १२०५ श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च माध्यमिक शाळेतील व्यपगत पदे व सन २०१९ पर्यंतच्या वाढीव पदांना अनुदान देण्यासाठी उच्चस्तरीय सचिवांच्या समितीऐवजी मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करून अनुदान देण्याबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाढीव पदांच्या नस्तीमध्ये विधी व न्याय विभागाने त्रुटी काढल्याने या त्रुटी पूर्ण करण्यासाठी संचालक शिक्षण यांच्याकडे ६ महिन्यापासून नस्ती प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अटींची पूर्तता करणाऱ्या शाळेतील वाढीव पदांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडून प्राप्त झालेली माहिती तपासण्यात येत आहे.

-----------------

## शिक्षकांना विनाअट वरिष्ठ व निवडश्रेणी मंजूर करणेबाबत

**(२) * १२४९ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७०४२ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षकांना वरिष्ठ व निवडश्रेणी दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ च्या शासन आदेशान्वये कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय मंजूर केली जात असून सन २०१४ पासून कुठलेही प्रशिक्षण आयोजित करण्यात आले नाही, तसेच सदरहू शासन निर्णयाने दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ पूर्वी १२ वर्षे व २४ वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांना विनाअट ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ नंतरही वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी पात्र असलेल्या शिक्षकांना त्यांचे प्रशिक्षण न झाल्याने वरिष्ठ व निवडश्रेणी मंजूर केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ नंतर पात्र असणाऱ्या शिक्षकांनाही प्रशिक्षणाशिवाय वरिष्ठ व निवडश्रेणी मंजूर करणेबाबत तसेच शिक्षकांना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांप्रमाणे १०, २०, ३० वर्षे टप्याप्रमाणे विना अट आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही. सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार १० वर्ष, २० वर्षे, ३० वर्ष ही तीन लाभांची सुधारीत आश्वासित प्रगती योजना लागू करणेसंदर्भात शासनाने शासन निर्णय दिनांक ३१/०७/२०१९ अन्वये अभ्यासगट नेमलेला असून अभ्यासगटाचा निर्णय झाल्यानंतर याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आयुक्त व उपसंचालक स्तरावर प्रलंबित असलेल्या शाळा व वर्ग तुकड्यांना वेतन अनुदान देण्याबाबत

**(३) * ११०२ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना शासन आदेश दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये अनुदान पात्र घोषित करण्यात असून ऑनलाईन/ऑफलाईन मुल्यांकन झालेल्या व मंत्रालयीन स्तरावर प्रलंबित असलेल्या तसेच संचालक/आयुक्त, पुणे यांच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या शाळांना अनुदान पात्र घोषित करण्यासाठी कार्यवाही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळा व वर्ग तुकड्या या शासनाकडून अनुदानास पात्र म्हणून घोषित करून सदर घोषित केलेल्या शाळांना प्रत्यक्ष अनुदान देण्यासाठी वेतन अनुदानाची तरतुद केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मंत्रालय, संचालक, आयुक्त व उपसंचालकस्तरावर प्रलंबित असलेल्या शाळा व वर्ग तुकड्या तसेच शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षणाची दुरवस्था व निदेशकांच्या अडचणींबाबत

**(४) * ४६८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षणाची दुरवस्था व निदेशकांच्या अडचणी यासंबंधात महाराष्ट्र राज्य आय.टी.आय. निदेशक संघटना यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर संघटनेच्या मागण्यांवर निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र राज्य आय.टी.आय. निदेशक संघटनेच्या मागण्यांसंदर्भात वेळोवेळी शासनस्तरावर बैठका घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील खाजगी प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत

**(५) * ९८४ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.कपिल पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.किशोर दराडे, डॉ.रणजित पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, वर्ग तुकड्या तसेच कनिष्ठ महाविद्यालय, जादा तुकड्या व अतिरिक्त शाखा यांना सरसकट २० टक्के अनुदानासाठी पात्र असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार शालेय शिक्षण विभागाने घोषित केले आहे, तसेच अनुदानास पात्र झालेल्या प्राथमिकच्या २७६ शाळा १०३१ वर्ग तुकड्या माध्यमिकच्या १२८ शाळा ७९८ वर्ग तुकड्या तसेच उच्च माध्यमिकच्या १६५६+१२३+२३+२२ शाळा अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ व दिनांक ९ मे, २०१८ च्या शासन आदेशाने खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील विनाअनुदानित शाळांना २० टक्के वेतन अनुदान देण्यात आले असून सदर शाळा १००% अनुदानास पात्र असल्याने सदरहू शाळांना पुढील अनुदानाचा टप्पा शासन आदेश काढून घोषित करण्यात येईल असे नमुद करण्यात आले असून दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजीचा शासन आदेश रद्द करून या शाळांना प्रचलितच्या नियमाने वेतन अनुदान देण्याबाबत मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ नुसार विनाअनुदानित शाळांना अनुदानाकरीता पात्र/अपात्र ठरविण्यात आले असून मंत्रिमंडळाच्या दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मुल्यांकनाच्या निकषानुसार पात्र ठरलेल्या १६२८ शाळा व २४५२ तुकड्यांना अनुदान मंजूर केले असून सर्व प्रकारच्या निकषांच्या अटी-शर्तीची पूर्तता केलेल्या शाळा पुन्हा अनुदानास

अपात्र ठरतील अशा कोणत्याही नव्या अटी अंतर्भूत करता येतील काय, नव्या अटींमुळे शाळा अपात्र ठरल्यास शाळांचे अनुदान धोरण, मुल्यांकन प्रक्रिया व मंत्रिमंडळाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण होईल असे शासनाचे मत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विनाअनुदान शाळांना अनुदान देताना पहिल्या वर्षी २०%, दुसऱ्या वर्षी ४०%, तिसऱ्या वर्षी ६०%, चौथ्या वर्षी ८०% व पाचव्या वर्षी १००% अनुदान देण्याचे प्रचलित धोरण मंत्रिमंडळापुढे मान्य करुन घेण्याचा शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करण्यासाठी मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, सन २०१२-२०१३ च्या वर्ग तुकड्यांचे प्रस्ताव अनुदानासाठी पात्र म्हणून घोषित करुन त्यांना वेतन अनुदानाची तरतूद करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शाळा व वर्ग तुकड्यांना शासनाकडून अनुदानास पात्र म्हणून घोषित करून अनुदान देण्याबाबत तसेच २० टक्के वेतन अनुदान घेत असलेल्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड** : (१) खरे आहे. तथापि, उच्च माध्यमिक अघोषित १६५६ व घोषित १४६ शाळा व १५ तुकड्यांना शासन निर्णय, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये सरसकट २० टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

(२) खरे आहे.

(३) शासन निर्णय, दिनांक २९ जानेवारी, २०२० अन्वये २० टक्के अनुदान सुरु असलेल्या प्राथमिक/माध्यमिक शाळा व तुकड्यांना दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ मधील अटी व शर्ती नुसार अनुदान देण्याची कार्यवाही करावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) प्रचलित सुत्र लागू करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे. तसेच १०० टक्के अनुदान प्राप्त शाळांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागू आहे.

(५) सदर बाब तपासण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील १३ गावांसाठी नळ पाणीपुरवठा मंजूर करणेबाबत

**(६) * २५ श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी शहरासह, कर्ला, नाचणे, कुवारबाव, हातखंबा आदी परिसरातील १३ गावांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, रत्नागिरी यांनी रुपये ७७ कोटीच्या अंदाजित खर्चाचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय, तसेच सदरहू नळ पाणीपुरवठा योजनेस मंजूरी दिली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू नळ पाणीपुरवठा योजनेस विनाविलंब मंजूरी देवून सदर काम पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी शहरासह, कर्ला, नाचणे, कुवारबाव, हातखंबा आदी परिसरातील १३ गावांसाठी पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

(२) सदर योजनेचा प्रस्ताव शासनास अद्याप सादर करण्यात आलेला नाही.

(३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रत्नागिरी यांनी रुपये ९७.६७ कोटी किंमतीचा नळ पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पनवेल या कार्यालयास दिनांक

०८/०७/२०१९ रोजी सादर केला होता. त्यावर मंडळ कार्यालयाने काही मुद्दे उपस्थित करुन मुद्दयांच्या पुर्ततेसाठी दिनांक २५/०९/२०१९ रोजीच्या पत्रान्वये विभागीय कार्यालयास प्रस्ताव परत पाठविला असून त्यांच्यास्तरावर मुद्दयांची पूर्तता करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथे समुद्र किनारपट्टीतील पाण्याच्या पातळीमध्ये वाढ झाल्याबाबत

**(७) * ६५४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या समुद्रातील किनारपट्टीच्या पाण्याच्या पातळीमध्ये पर्यावरणाच्या बदलामुळे दिवसेंदिवस वाढ होऊन मुंबई शहराला पुर परिस्थितीचा धोका निर्माण झाला असल्याचे आयपीसीसी या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून इशारा दिल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई येथील समुद्राच्या पाण्याच्या वाढत्या पातळीमुळे निर्माण झालेला धोका विचारात घेता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) व (२) इंटरनॅशनल पॅनल ऑन क्लायमेट चेंज (आयपीसीसी) या संस्थेने सप्टेंबर २०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार जागतिकस्तरावर समुद्राच्या पातळीत वाढ होत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

"वातावरणीय बदल" ही क्रिया सामान्यतः निसर्गात होत असते परंतु अलिकडच्या काळात याच्या गतीत वाढ झालेली आहे.

राज्य शासनाने TERI या संस्थेबरोबर सामंजस्य करार करुन वातावरणीय बदलांमुळे उद्‌भवणाऱ्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी सन २०३०, २०५० व २०७० या कालखंडामध्ये होणाऱ्या वातावरणीय बदलांबाबतचे शास्त्रोक्त अनुमानाच्या अनुषंगाने सविस्तर कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

तसेच सदर कृती आराखड्यात मुंबई शहरासंबंधित पाऊस, पूरजन्यस्थितीबाबत अभ्यास करण्यात आलेला असून त्यानुषंगाने राबवावयाच्या उपाययोजनाबाबत (Integrated Flood Management Plan for Mumbai City) शिफारस करण्यात आलेली आहे.

सदरच्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत कार्यवाही होत आहे. मुंबई शहरात पूरजन्य परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई शहराची १२१ पाणलोट क्षेत्रात विभागणी करुन संपूर्ण जलवाहिन्या प्रणालीचा अभ्यास करुन त्यातील कमतरतांचा अभ्यास करुन ब्रिमस्टोवॅड अहवाल तयार केलेला असून शहरामध्ये भूमिगत नाले, गटारे, पेटिका नाले यांचे संवर्धन व पुनवर्सन, नवीन पर्जन्य वाहिनींचे आरसीसीमध्ये बांधकाम, नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण, पर्जन्य जल उदंचन केंद्रांचे बांधकाम इ. कामे करण्यात येत आहेत. जेणे करुन पावसाळी पाण्याचा निचरा जलदगतीने होण्यास मदत होणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत

**(८) * ४३२ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४६५१६ ला दिनांक २४ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम माहे डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून यासाठी सुमारे १३८० हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील ठाणे-पालघरसह जवळच्या भागातील सुमारे १२०० हून जास्त व्यक्ती प्रकल्पबाधित होणार असल्याने त्यांचे पुनर्वसन कशाप्रकारे होणार याबाबत स्पष्टता नसल्यामुळे प्रकल्पबाधितांचा जमीन अधिग्रहणास विरोध असून माहे नोव्हेंबर, २०१९ पर्यंत सुमारे १६७ जणांनी या प्रकल्पासाठी जमीन दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी एकूण किती जमिनीची आवश्यकता आहे, त्यासाठी किती व्यक्ती प्रकल्प बाधित होणार आहेत, सदरहू व्यक्तींचे पुनर्वसन करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाबाबत निर्णय घेण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व याबाबत निर्णय घेण्यास किती कालावधी लागणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी सुमारे रुपये २५ हजार कोटी एवढा निधी शासनामार्फत उपलब्ध करावयाचा असून जायकाच्यावतीने उपलब्ध करावयाच्या कर्जाचा भारसुध्दा राज्य शासनावर पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील प्राधान्यावर असलेल्या विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) होय.

(२) व (३) ठाणे आणि पालघर जिल्हयातील सुमारे २६३० कुटुंब प्रकल्पबाधित होणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या “भूसंपादनाचा योग्य मोबदला मिळण्याचा अधिकार आणि प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन आणि पुनर्स्थापनेसाठी पारदर्शकता कायदा २०१३” आणि महाराष्ट्र शासनाच्या इतर शासकीय आदेशानुसार प्रकल्पबाधित कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. प्रकल्पबाधित लोकांकडून भूसंपादनासाठी त्यांची संमती मिळवण्याचे प्रयत्न

सुरू असून आतापर्यंत ३०७ भूखंडांसाठी खरेदीखते नोंदविण्यात आली आहेत. संपूर्ण प्रकल्पासाठी साधारणपणे १३८० हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. महाराष्ट्र शासनाद्वारे मदत आणि पुनर्वसन करण्यासाठी प्रशासकाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) सदर प्रकल्प उभारणीकरीता स्थापन केलेल्या विशेष उपयोजिता वाहनाचे (SPV) एकूण प्राधिकृत भाग भांडवल मूल्य रुपये २०,००० कोटी एवढे आहे व त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचे भाग भांडवल मूल्य रुपये ५,००० कोटी (२५%) एवढे आहे. कर्जफेडीची प्राथमिक जबाबदारी ही राष्ट्रीय जलद गती रेल्वे महामंडळ मर्यादित आणि केंद्र शासनाची राहणार आहे.

(५) राज्यातील प्राधान्यावर असलेल्या विकास कामासाठी दरवर्षी वार्षिक नियोजन कार्यक्रमामध्ये निधी देण्याची कार्यवाही नियमितरित्या सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथे अल्पसंख्यांक कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(९) * ४७५ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांकांसाठी औरंगाबाद येथे कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्यास केंद्र शासन अनुकूल आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबईतील भायखळा येथे उर्दु भवनासाठी रुपये ५० कोटींचे अनुदान मिळण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील बाबींकरीता निधी मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) नाही.

तत्कालीन मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी त्यांच्या दिनांक ५ एप्रिल, २०१८ च्या अर्धशासकीय पत्रान्वये, तत्कालीन केंद्रीय मंत्री (अल्पसंख्यांक) यांच्याकडे अल्पसंख्यांक कौशल्य विकास विद्यापीठ स्थापना आणि त्यासाठी रुपये १०० कोटी इतक्या अनुदानाची मागणी केली आहे. मात्र याबाबत केंद्र शासनाकडून अद्याप प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठांतर्गत गरवारे इन्स्टिटयूटमध्ये अनेक अभ्यासक्रम सुरु असल्याबाबत

**(१०) * १०५० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठांतर्गत गरवारे शिक्षण संस्थेशी सामंजस्य करार करून सुरु करण्यात आलेल्या नवनवीन अभ्यासक्रमासाठी जास्त पैसे आकारुन त्यापैकी नाममात्र रक्कम विद्यापीठाला देऊन पदवी देण्याचा उद्योग मुंबई शहरातील अनेक नामांकित संस्थांनी सुरु केला असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार काम करणाऱ्या अनेक महाविद्यालयांची संख्या यामुळे कमी होवू लागल्याने काही महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून अभ्यासक्रमाची परवानगी घेण्याऐवजी थेट गरवारे संस्थेशी सामंजस्य करार करण्याचा पर्याय निवडला असल्याने विद्यापीठाच्या पदवीचे महत्व कमी होत असल्याची शंका अधिसभासदस्यांकडून व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरवारे शिक्षण संस्थेकडून कौशल्य विकास अभ्यासक्रमाच्या नावाखाली खाजगी संस्थेशी सामंजस्य करार करून मान्यता नसलेले अभ्यासक्रम चालविण्यात येत असून त्यासाठी विद्यार्थ्यांकडून जास्तीचे शुल्क आकारले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार गरवारे इन्स्टिट्युटमार्फत देण्यात आलेल्या पदव्यांची माहिती घेण्यात आली आहे काय, सदर पदव्या नियमबाह्यरित्या देण्यात आल्या आहेत किंवा कसे याबाबत चौकशी करुन तद्नुसार संबंधित दोषी संस्थाचालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही. विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख, नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था ही मुंबई विद्यापीठाची स्वायत्त संस्था आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नाही. गरवारे शिक्षण संस्थेंतर्गत चालविण्यात येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांना विद्यापीठाच्या विद्यापरिषदेची मान्यता घेऊन तसेच अभ्यासक्रमांचे शुल्क प्रथम गरवारे शिक्षण संस्थेच्या सल्लागार समिती व व्यवस्थापन मंडळाच्या सभेमध्ये मान्य करुन अंतिम मान्यतेसाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर केले जातात. या बाबींची पूर्तता केल्यानंतरच अभ्यासक्रमांची सुरुवात होते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील परिवहन कार्यालयात उपहारगृहाची व्यवस्था नसल्याबाबत

**(११) * ३२५ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर, नागपूर (पूर्व) व नागपूर ग्रामीण अशा तिन्ही प्रादेशिक परिवहन कार्यालयात उपहारगृहाची व्यवस्था नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहरातील व ग्रामीण भागातील प्रादेशिक व उपप्रादेशिक इमारतीचे लोकार्पण झालेल्या किती कार्यालयामध्ये उपहारगृहाची सुविधा ठेवण्यात आली आहे तसेच किती इमारतीमध्ये उपहारगृहाची व्यवस्था होणे प्रलंबित आहे, सदर इमारती व परिसरामध्ये अवैधरित्या खाद्य पदार्थातून विषबाधा झाल्यास यास परिवहन विभाग जबाबदार असणार आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपहारगृहाची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) नागपूर शहरातील प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर) हे कार्यालय स्वमालकीच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे. विभागाच्या दिनांक २८/०५/२००२ च्या परिपत्रकान्वये मोटार वाहन विभागाच्या कोणत्याही कार्यालयातील वा आवारातील जागा, गॅरेजेस इत्यादीचे कोणत्याही खाजगी व्यक्ती/संस्था, राजकीय वा इतर संघटना इत्यादींना कार्यालय किंवा व्यवसायासाठी भाडेतत्वावर/कायमस्वरुपी वाटप करण्यात येऊ नये अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (पूर्व) व प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (ग्रामीण) ही कार्यालये भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. प्रस्तुत कार्यालयाच्या बाहेर अन्न पदार्थाची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर नियंत्रण ठेवण्याची बाब परिवहन विभागाच्या अखत्यारित नाही. त्यामुळे संबंधित विभागांना कार्यवाहीच्या सूचना देण्याबाबत आदेश दिलेले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील अनेक गावात पाणीपुरवठा होत नसल्याबाबत

**(१२) * ४५४ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यामध्ये वैतरणा व सूर्या हे दोन मोठे धरण असून तेथील दातीवली गाव, केळवा, कोरा, उसरणी, सातपाटी, उच्छडी, दांडा, तारापूर, चिंचणी, दांडेपाडा, वरून वाढवण आणि डहाणू या सर्व गावांमध्ये महिन्यातून एकदा किंवा दोनदाच पाणीपुरवठा होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई आणि ठाणे या दोन जिल्ह्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या वैतरणा व सूर्या धरणाच्या पाण्यापासून शासन स्थानिक गावकऱ्यांना वंचित ठेवत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर गावांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) पालघर तालुक्यातील बाडापोखरण प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेमध्ये २९ गावे समाविष्ट असून योजनेचा उद्‌भव साखरे धरण आहे. सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सन २००० मध्ये पूर्ण करुन पालघर जिल्हा परिषदेस हस्तांतरीत करण्यात आली असून वाढीव बाडा पोखरण योजनेचे काम प्रगतीत आहे. केळवा-माहिम व १८ गावे प्रादेशिक नळ पाणी योजनेची अंदाजपत्रके व आराखडे केंद्र शासनाच्या जलजीवन मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेबाबत

**(१३) * ८१८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यामधून सन २०१८ व २०१९ या दोन वर्षात सुमारे ६० प्रस्ताव औरंगाबाद जिल्हा परिषदेकडे दाखल झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून बहुतांश विद्यार्थी कुटुंबाला सदर योजनेचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेचा लाभ विद्यार्थी कुटुंबाला मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशत: खरे आहे. जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या कार्यालयास सन २०१८ व २०१९ या दोन वर्षात १३३ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यामध्ये पात्र ९८ विद्यार्थी कुटुंबांना लाभ देण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हा परिषदेच्या उपशिक्षणाधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१४) * ७१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात उपशिक्षणाधिकाऱ्यांची दोन मंजूर पदे मागील ३ वर्षापासून रिक्त असून विस्तार अधिकाऱ्यांच्या पाच पदांपैकी केवळ ३ पदे भरलेली असताना या विस्तार अधिकाऱ्यांना उपशिक्षणाधिकारी पदांचा कार्यभार सोपविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हा विस्ताराने मोठा असल्याने या ठिकाणच्या उपशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी यांची मंजूर असलेली रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा परिषद शाळांमधून सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षण घेत असल्याने त्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी उपशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सरळसेवेने भरावयाच्या पदावर वित्त विभागाने तसेच पदोन्नतीने भरावयाच्या पदावर सामान्य प्रशासन विभागाने मर्यादा आणली असल्यामुळे सदर संवर्गातील काही पदे रिक्त आहेत.

(३) रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत असताना मृत पावलेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना एकत्रितरित्या आर्थिक मदत करणेबाबत

**(१५) * ५५३ अॅड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय, निमशासकीय, खाजगी अनुदानित संस्थांमध्ये सेवेत आलेल्या शिक्षक व सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत विविध आंदोलने झाल्याने त्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत असताना मृत पावलेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना एकत्रित रुपये १० लाख देण्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २००५ नंतर शासकीय, निमशासकीय, खाजगी अनुदानित संस्थांमध्ये नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना केव्हा लागू करण्यात येणार आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२) व (३) दिनांक ०१/०१/२००५ पूर्वी नियुक्त झालेल्या राज्यातील सर्व अनुदानित, विनाअनुदानित, अंशत: अनुदानित पदांवर व तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात विविध आंदोलने झाली आहेत हे खरे आहे. या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी दिनांक २४/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये संयुक्त समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबत दिनांक २०/०८/२०१९ रोजी शासन निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

## कोकणात 'बीच-शॅक पॉलिसी' कार्यान्वित करण्याबाबत

**(१६) * २७४ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र पर्यटन महामंडळाकडून गोवा राज्याच्या धर्तीवर कोकण किनारपट्टीवर 'बीच-शॅक पॉलिसी' कार्यान्वित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच सदरहू प्रस्तावाच्या शासन मान्यतेबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे, तसेच उक्त प्रस्तावाकरीता शासनाने किती निधी राखीव ठेवला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) होय.

(२) प्रस्तावित बीच-शॅक पॉलिसीमध्ये समुद्रकिनारी सामुदायिक सुविधा केंद्र (उपहारगृह, स्वच्छतागृह, वॉचटॉवर, चेंजींग रुम इ.), पारदर्शक पध्दतीने लॉटरीव्दारे निवड, स्थानिकांना रोजगारामध्ये प्रथम प्राधान्य, समुद्र किनारी खाजगी जमिनीवर रेस्टॉरंट व तंबू उभारणे, आयुर्वेदिक पंचकर्म, खाद्य आणि पेय पदार्थ इत्यादी बाबींचा समावेश आहे.

सदर बीच-शॅक धोरण घोषित करण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(३) बीच-शॅक धोरणाची अंमलबजावणी व निधीची तरतूद मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## फिरोज गांधी विद्यालय, धम्मदीप नगर, नागपूर शाळेत सोयी सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(१७) * ७१५ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फिरोज गांधी विद्यालय, धम्मदीप नगर, नागपूर ही शाळा कच्चे बांधकाम असलेल्या टिनच्या शेडमध्ये सुरू असून शाळेत कोणत्याही भौतिक सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे तसेच या शाळेत कर्मचाऱ्यांच्या बोगस नियुक्त्या केल्या असल्याने शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना दिलेल्या चौकशी आदेशानुसार दिनांक ३१ जानेवारी, २०११ रोजी चौकशी अहवाल शिक्षण विभागाकडे सादर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेला अल्पसंख्यांक विकास विभागाने दिलेला अल्पसंख्यांक दर्जा दिनांक १७ मे, २०१७ रोजी रद्द करुन यावर संस्थेने केलेले अपील प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभागाने दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी नाकारले, तसेच शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग यांनी पुनश्च: शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत आरटीई अंतर्गत चौकशी करून चौकशी अहवाल दिनांक २० मे, २०१९ रोजी शासनास सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील ८ ते ९ वर्षापासून संस्थेविरूध्द चौकशी करून व नोटीसा देवूनही कोणतीच कारवाई न केल्याने जाणीवपूर्वक प्रकरण प्रलंबित ठेवण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित संस्थेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच कारवाई केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

शाळेचा अल्पसंख्यांक दर्जा दिनांक १७/०५/२०१७ रोजी काढण्यात आला होता. तसेच अल्पसंख्यांक विकास विभागाने दिनांक ११/०९/२०१७ अन्वये त्यावरील अपिलही नाकारले आहे.

दिनांक २०/०५/२०१९ अन्वये शिक्षणाधिकाऱ्यांनी उपसंचालकास चौकशी अहवाल सादर केला होता. तथापि, सदर चौकशी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व नियम २०११ तसेच शासन निर्णय, दिनांक १८/०४/२०१३ नुसार गठीत समितीव्दारे केलेली नसल्याने शिक्षणाधिकाऱ्यांना आरटीई समितीव्दारे चौकशी करण्याच्या सूचना देऊन चौकशी करण्यात आली. सदर चौकशीचा अहवाल दिनांक २८/०२/२०२० रोजी उपसंचालकास प्राप्त झाला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) उपसंचालकाकडे प्राप्त अहवालावर नियमोचित कार्यवाहीची तजवीज ठेवली आहे.

-----------------

## रायगड जिल्ह्यात भात खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

**(१८) * ८६४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात भात खरेदीचे प्रमाण जास्त असल्याने भात खरेदी करण्यासाठी जिल्ह्यात ३० खरेदी केंद्राची शासनाने निर्मिती केली असून म्हसळा व तळा तालुक्यात शेतकऱ्यांसाठी भात खरेदी केंद्रच नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यात सन २०१८-२०१९ या वर्षामध्ये खरेदी केलेला भात सुरक्षित ठेवण्यासाठी शासकीय मालकीची गोदामे नसल्याने भाड्याने घेतलेल्या गोदामात भात ठेवला जात असल्याने खरेदी केलेल्या भाताच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, तसेच खरेदी केलेला भात भरडण्यासाठी एजन्सीबाबत असलेले शासनाचे आदेशही माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रायगड जिल्ह्यात शासकीय मालकीची गोदामे बांधण्यासाठी व नवीन भात खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

तथापि, म्हसळा व तळा या ठिकाणी खरेदी केंद्र नसले तरी सदरची दोन्ही गावे माणगाव व राणीवली या खरेदी केंद्रांना जोडली असून या खरेदी केंद्रांवर म्हसळा व तळा येथील शेतकऱ्यांचे धान खरेदी करणे सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

हंगाम २०१८-२०१९ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या धानाच्या साठवणुकीसाठी आवश्यकतेनुसार सहकारी व खाजगी गोदामे भाड्याने घेण्यात आलेली असून सर्व धानाची सुरक्षित साठवणूक करण्यात आलेली आहे.

धान भरडाईसंदर्भात शासन परिपत्रक दिनांक ०८/११/२०१९ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(३) नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधींतर्गत रायगड जिल्ह्यात ४ नवीन गोदामांचे बांधकाम पूर्ण होऊन सदर गोदामांचे हस्तांतरण विभागाकडे करण्यात आलेले आहे.

रायगड जिल्ह्यातील २१ नादुरुस्त गोदामांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार आवश्यक त्या ठिकाणी नवीन खरेदी केंद्र जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेनुसार सुरु करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना चुकीच्या अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका दिल्याबाबत

**(१९) * ९१ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठामार्फत एमएससी भौतिकशास्त्र सत्र तीनमधील स्टॅटिस्टिकल मेकॅनिक्स विषयाची परीक्षा दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निश्चित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षेला बसलेल्या नवीन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमाच्या पेपर कोडच्या प्रश्नपत्रिका देण्यात आल्या, तर जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाच्या पेपर कोडच्या प्रश्नपत्रिका देण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांनी त्याच दिवशी तक्रार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना न्याय देण्याऐवजी विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाने विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेण्यात येणार असल्याचा निर्णय मंडळाच्या दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजीच्या बैठकीत घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यापीठाच्या सदर निर्णयास विरोध दर्शवून "यापूर्वी झालेल्या आणि पुन्हा नव्याने घेण्यात येणाऱ्या परिक्षेपैकी ज्या परिक्षेत जास्त गुण असतील ते ग्राहय धरण्यात येतील" असा परीक्षा मुल्यमापन मंडळाने यापूर्वीच निर्णय घेतला असताना त्याऐवजी आता घेण्यात आलेला निर्णय हा विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा असल्याने त्या निर्णयाचा फेरविचार करावा अशी मागणी सिनेट सदस्यांनी विद्यापीठाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिकदृष्टया सदर निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच फेरविचाराअंती कोणता निर्णय घेण्यात आला आहे ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही. परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या दिनांक २६ डिसेंबर, २०१९ च्या बैठकीमध्ये “विद्यार्थ्यांना दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी झालेल्या व नव्याने घेण्यात येणाऱ्या परीक्षेपैकी ज्या परीक्षेत जास्त गुण असतील ते ग्राहय धरण्यात येतील” असा ठराव पारीत केला असून सदर ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठाने दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यानुसार दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी फेरपरीक्षा घेण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड येथील प्राध्यापकांच्या पदांना मान्यता मिळणेबाबत

**(२०) * २०२ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री गुरु गोंविदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेडची स्थापना सन १९८१ साली होऊन सन २००४ साली संस्थेस स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेमध्ये दहा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राबवले जात असून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या नियमानुसार २४३ प्राध्यापक कायमस्वरुपी कार्यरत असणे आवश्यक असताना सन २००४ मध्ये शासनाने मान्यता दिलेल्या १०९ पदांपैकी फक्त ६८ प्राध्यापक कायमस्वरुपी कार्यरत असून ४१ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून संस्थास्तरावर नेमणुका देवून सन २०११ पासून विविध शाखेत १६ प्राध्यापक कंत्राटी पध्दतीने कार्यरत असून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या नियमाप्रमाणे पद मान्यता मिळण्यासाठी संस्थेने शासनाकडे दिलेला प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या नियमाप्रमाणे पदमान्यता देऊन कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या प्राध्यापकांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशतः खरे आहे.

श्री गुरु गोंविदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड या संस्थेस दिनांक १९/०७/२००२ च्या शासन निर्णयानुसार स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे.

(२) अंशतः खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक ०१/०४/२००४ नुसार संस्थेकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांनुसार सन २००४ च्या पदांच्या आढाव्यामध्ये संस्थेस १० पदवी व ३ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरीता एकूण १०९ शिक्षकीय पदे मंजूर केली आहेत. त्यापैकी सद्य:स्थितीत ६८ अध्यापक कायमस्वरूपी कार्यरत असून ४१ पदे रिक्त आहेत.

(३) व (४) अंशतः खरे आहे.

संस्थेमार्फत संस्थास्तरावर निर्माण केलेल्या अध्यापकांच्या पदांवर संस्थेत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने १६ अध्यापक कार्यरत असून त्यांची सेवेत कायम करण्याची विनंती असलेली रिट याचिका क्र. ४५४६/२०१६ मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे प्रलंबित आहे.

शासनाने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या सन २०१९-२०२० च्या मानकांनुसार दिनांक ०७/१२/२०१९ च्या शासन निर्णयानुसार संस्थेचा शिक्षकीय पदांचा आढावा मंजूर केला आहे. त्यानुसार संस्थेस १ संचालक, १३ प्राध्यापक, ३० सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापकांची ९६ पदे अशी एकूण १४० पदे मंजूर केली असून ती भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच संस्थेने कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या अध्यापकांची सेवा नियमित करण्याबाबत शासनाचे धोरण नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पसंख्यांक समाजाकरीता स्वतंत्र संचालनालयाची स्थापना करण्याबाबत

**(२१) * ३७१ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ४६७९० ला दिनांक २७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अल्पसंख्यांक समाजाकरीता स्वतंत्र संचालनालयाची स्थापना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे आश्वासन मा.अल्पसंख्यांक मंत्री यांनी माहे जून, २०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संचालनालयाचे मुख्यालय कोणत्या ठिकाणी करण्यात येणार आहे, त्याकरीता लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदे भरती करण्यात आली आहे काय तसेच हे संचालनालय प्रत्यक्षात केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे ?

**श्री.नवाब मलिक :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## भडकेल (ता.शिरुर, जि.बीड) गावात पिण्याच्या पाण्याच्या योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) * ७५६ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडकेल (ता.शिरुर, जि.बीड) गावासह वाड्या व रस्त्यावरील पिण्याच्या पाण्याची योजना सन २०१२ मध्ये सुरु केली असून सदर योजनेत तेथील पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमताने लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील नागरिकांनी सदर प्रकरणाची चौकशी करुन सदर प्रकरणात दोषी असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करावी म्हणून दिनांक १२/६/२०१९, २१/८/२०१९ व दिनांक २९/१०/२०१९ रोजी जिल्हाधिकारी, बीड, विभागीय आयुक्त, औरंगाबाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, बीड यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनानुसार कार्यवाही करुन संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्रकरणात एकूण किती रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम धोरणानुसार भडकेल साबळेवाडी ता.शिरुर (का) पाणीपुरवठा योजनेचे काम अध्यक्ष/सचिव ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती भडकेल ता.शिरुर (का) यांच्यामार्फत होणे अपेक्षित होते. त्यानुसार शासनाने पाणीपुरवठा योजनेस दिलेला पहिला हप्ता व लोकवर्गणी मिळून एकूण रक्कम रुपये १४.७१ लक्षपैकी समितीने रुपये ९.८४ लक्ष इतक्या निधीचा हिशोब दिला नाही. अथवा इतक्या रकमेचे समितीने काम केले नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर समितीने पाणीपुरवठा योजनेसाठी देण्यात आलेल्या एकूण रक्कम रुपये १४.७१ लक्षपैकी रुपये ९.८४ लक्ष अग्रिमाचा अपहार केल्यामुळे समितीच्या विरोधात दिनांक ८/१०/२०१३ रोजी अंमळनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच अध्यक्ष/सचिव यांच्या वैयक्तिक मालमत्तेवर रुपये ९.८४ लक्ष रकमेचा बोजा चढवण्यात आला आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## खेड (ता.खेड, जि.रत्नागिरी) बस स्थानकाच्या सुधारीत बांधकामाबाबत

**(२३) * ९२० श्री.रामदास कदम :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (ता.खेड, जि.रत्नागिरी) बस स्थानकाचे सुधारीत बांधकाम करुन सुसज्ज बसस्थानक बनविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, खेड आगाराची अवस्था समस्यांचे आगार झाले असून, प्रवाश्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याने बसस्थानकांच्या बांधकामाला कधी सुरुवात करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) खेड येथे ३७ आर जागेत जुन्या पध्दतीचे ४ फलाटांचे बसस्थानक कार्यरत आहे. बसस्थानकात प्रवाशांकरीता सर्व मुलभूत सुविधा उपलब्ध आहे. बसस्थानकात गाड्यांच्या चलनवळनासाठी/ वाहनतळासाठी जागा अत्यंत अपूरी असल्याने अन्य ठिकाणी असलेल्या आगारालगतच्या जागेत सुसज्ज, वाहतूकीस अनुरुप असे नवीन बसस्थानक बांधण्याचे विचाराधीन आहे. बसस्थानकाचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्यासाठी वास्तुविशारदांची नेमणूक करण्यात आली असून, त्यांनी बसस्थानकाचे आराखडे सादर केले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात समान शिधापत्रिका संकल्पना राबविण्याबाबत

**(२४) * ११५८ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण देशभर समान शिधापत्रिका संकल्पना राबविण्यासाठी केंद्राने त्याचे डिझाईन तयार करून सर्व राज्यातील लोकांना याच डिझाईनची शिधापत्रिका द्यावी असे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समान शिधापत्रिका केव्हापासून अस्तित्वात येणार आहे तसेच ही समान शिधापत्रिका दुसऱ्या राज्यातही लागू होणार आहे काय, सदर शिधापत्रिकाद्वारे अन्न सुरक्षा कायद्यानुसार सर्व रास्त दुकानांमध्ये स्वस्त दरात अन्नधान्य वितरण केले जाणार आहे काय व किती प्रमाणात धान्य वितरीत करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समान शिधापत्रिका संकल्पना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या "एक देश एक रेशन कार्ड" या योजनेंतर्गत संबंधित रास्तभाव दुकानात आधार Authentication करुन लाभार्थ्याला कोणत्याही राज्यातील कोणत्याही रास्तभाव दुकानातून धान्य उचलण्याची सोय उपलब्ध होणार आहे. ही योजना १ जानेवारी, २०२० पासून १२ राज्यांत लागु करण्यात आली आहे.

(३) केंद्र शासनाच्या "एक देश एक रेशन कार्ड" या योजनेंतर्गत सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या शिधापत्रिकांद्वारेच पोर्टेबिलिटी सुविधेद्वारे पात्र लाभार्थी इतर राज्यात त्यांना अनुज्ञेय असलेल्या धान्याची उचल करु शकतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील शौचालयाच्या कामांची पुनर्तपासणी करण्याबाबत

**(२५) * ६८९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन अभियानांतर्गत उभारण्यात आलेल्या शौचालयांची कामे केवळ कागदोपत्रीच पूर्ण करण्यात आली असून बहुतांशी ठिकाणी गैरप्रकार झाल्याने मागील चार वर्षात मंजूर झालेली व पूर्ण झालेली शौचालयांची कामे यांची पुनर्तपासणी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी मुख्य सचिव यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार वर्षात करण्यात आलेली शौचालयाची कामे, वितरीत करण्यात आलेला निधी, अधिकाऱ्यांनी व कंत्राटदार यांनी केलेले गैरव्यवहार व इतर सर्व प्रकरणांची वरिष्ठस्तरावरून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शौचालयाच्या कामांची पुनर्तपासणी करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, सामाजिक कार्यकर्ते यांनी अशी मागणी केली आहे.

(२) होय, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

(३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त अहवालानुसार तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०८/०४/२०१९ च्या ज्ञापनान्वये दोषारोपपत्र बजावून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानसेवी शिक्षकांना सेवेत कायम करण्याबाबत

**(२६) * ९३९ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषा फाऊंडेशन वर्ग योजनेंतर्गत अमराठी अल्पसंख्यांक शाळांमध्ये इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकविण्यासाठी नेमण्यात आलेल्या मानसेवी शिक्षकांना मागील वर्षभर वेतन मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांना सेवेत कायम करण्याबाबत मानसेवी शिक्षक संघटनेने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) हे खरे नाही.

मराठी भाषा फाऊंडेशन योजनेंतर्गत नियुक्त मानसेवी शिक्षकांना सन २०१८-२०१९ चे मानधन अदा करण्यात आलेले आहे. तर सन २०१९-२०२० चे मानधन अदा करण्याकरीता निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यानुसार मानधन वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मराठी भाषा फाऊंडेशन योजनेंतर्गत नियुक्त मानसेवी शिक्षकांकडून इयत्ता ८ वी ते १० वी च्या अमराठी शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेनंतर मराठी भाषा शिकविण्याकरीता अतिरिक्त शिकवणी करण्यात येते त्यासाठी त्यांची मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येते शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येते. त्यामुळे सदर शिक्षकांना सेवेत कायम करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी चित्रकला व फार्मसी महाविद्यालयांना वेतन अनुदान देण्याबाबत

**(२७) * २३४ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४७१२ ला दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी चित्रकला, फार्मसी व अध्यापक महाविद्यालयांना १००% वेतन अनुदान देण्याबाबत संबंधित संचालकांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील खाजगी चित्रकला व फार्मसी महाविद्यालयांना ९०% ऐवजी १००% वेतन अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, कला व संचालक, तंत्र शिक्षण यांनी शासनास सादर केला आहे.

राज्यातील अनुदानित अध्यापक महाविद्यालयांना १००% वेतन अनुदान दिले जात असल्यामुळे संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून याबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने अंतिम निर्णय झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यात टी.व्ही, मोबाईल, कॉम्प्युटर, ए.सी. इत्यादी "ई" कचऱ्याचे विल्हेवाट लावण्याची समस्या निर्माण झाल्याबाबत

**(२८) * १०८१ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात टी.व्ही, मोबाईल, कॉम्प्युटर, ए.सी. इत्यादी "ई" कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कचऱ्यांचे वर्गीकरण पुनर्प्रक्रिया करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) नाही.

(२) नागरी घनकचऱ्यामध्ये मिसळलेला ई-कचरा वेगळा करून संकलित करणे व तो कचरा अधिकृत डिसमॅनटलर्स किंवा रिसायकलर्सकडे पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सर्व महानगरपालिकांना ई-कचरा (व्यवस्थापन) नियम २०१६ अंतर्गत तरतुदींचे पालन करण्याबाबत निर्देश दिले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून विविध माध्यमाव्दारे जसे वर्तमानपत्र, ईलेक्ट्रिसिटी बिल्स, रेडिओ इत्यादीव्दारे जनजागृती केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ११ जिल्ह्यातील ५८३ बालके "शिक्षण हमी कार्ड" पासून वंचित असल्याबाबत

**(२९) * ९०९ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्थलांतरीत बालकांना शिक्षण हक्क कायद्यानुसार "शिक्षण हमी कार्ड" वितरीत करण्यात येत असताना राज्यातील ११ जिल्ह्यातील ५८३ बालके "शिक्षण हमी कार्ड" पासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५८३ बालके "शिक्षण हमी कार्ड" पासून वंचित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन "शिक्षण हमी कार्ड" पासून बालकांना वंचित ठेवणाऱ्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांवर कारवाई करुन स्थलांतरीत बालकांना "शिक्षण हमी कार्ड" देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.

सर्वेक्षणातील ६०९ मुलांपैकी २५ मुलांना शिक्षण हमी कार्ड देण्यात आले आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

विविध कारणांनी गावा-गावातून अनेक कुटुंबे ऊसतोड, विटभट्टी, मातीकाम अशा विविध कारणांनी स्थलांतरीत होतात. हे लक्षात घेऊन स्थलांतरीत होण्याच्या कालावधी पूर्वी सर्व्हेक्षण केले जाते व स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबांची यादी तयार करून कुटुंबासोबत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना स्थलांतरीत होण्यापासून थांबविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी हंगामी वसतिगृहाची व्यवस्था केली जाते व विविध प्रयत्न करूनही विद्यार्थी स्थलांतर होत असल्यास सदर विद्यार्थ्यांना शिक्षण हमी कार्ड देण्यात यावे असे निर्देश दिनांक २३/१०/२०१९ च्या परिपत्रकान्वये क्षेत्रिय अधिकाऱ्यांस देण्यात आले आहेत.

स्थलांतर करणाऱ्या सर्वेक्षणातील कुटुंबापैकी बरीचशी कुटुंबे आर्थिक, वैयक्तिक कारणास्तव अचानक अवेळी किंवा रात्रीचे वेळी स्थलांतर करतात त्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षण हमी कार्ड देणे शक्य होत नाही.

परंतु अशी मुले ज्या ठिकाणी स्थलांतरीत होतात त्या ठिकाणी त्यांना बालरक्षक चळवळीद्वारे जवळच्या शाळेत त्यांच्या वयानुसार दाखल करून घेतले जाते. अशा विद्यार्थ्यांकडे शिक्षण हमी कार्ड नसले तरी ते शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत याची काळजी क्षेत्रिय अधिकारी व शाळांचे मुख्याध्यापक यांच्याकडून घेतली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम येथे अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र निर्माण करण्याबाबत

**(३०) * ११४४ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथे अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र होण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, खरे आहे.

(२) विद्यापीठ परिक्षेत्रात विद्यापीठाचे उपकेंद्र निर्मितीकरीता धोरण निश्चित करण्यासाठी डॉ.योगानंद काळे, माजी प्रकुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली शासनाद्वारे समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने उपकेंद्र स्थापन करण्यासाठी निकष निश्चित केले आहेत. या निकषानुसार सदर प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली गोंडवाना विद्‌यापीठांतर्गत जमीन अधिग्रहित करताना गैरप्रकार झाल्याबाबत

**(३१) * १०० श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ४७५७१ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली गोंडवाना विद्‌यापीठांतर्गत जमीन अधिग्रहित करताना गैरप्रकार झाल्याचे सिनेट सदस्यांनी व्यवस्थापन समितीच्या अधिसभेत प्रश्न उपस्थित करून सदर प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याची मागणी केल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादन प्रक्रियेतील मुल्यांकन संदर्भात लोकप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली जमीन गैरप्रकाराची चौकशी करण्यासंबंधी नेमण्यात आलेल्या समितीने दिनांक ३ मे, २०१९ रोजी सादर केलेल्या अहवालात ९ शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी किंमतीत तफावत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू जमीन गैरप्रकारातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) गोंडवाना विद्‌यापीठाकरीता जमीन खरेदीच्या प्रक्रियेमध्ये अनियमितता आढळून आल्यामुळे संबंधित जबाबदार तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, गडचिरोली, सहायक अभियंता श्रेणी-१, सा.बां.विभाग क्र.१, गडचिरोली व सहा.अभियंता श्रेणी-२, सा.बां.विभाग क्र.१, गडचिरोली यांचेवर दोषारोप ठेवून त्यांचेविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) अधिनियम १९७९ मधील तरतूदीनुसार विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच गोंडवाना विद्यापीठांतर्गत जमीन अधिग्रहीत करताना झालेल्या गैरप्रकाराची एसआयटी (SIT) मार्फत चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कौशल्य विकास योजनेतून बेराजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३२) * १६६२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात 'मेक इन इंडिया' या धोरणेंतर्गत अपेक्षित नोकऱ्यांची निर्मिती न झाल्याने बेरोजगारांच्या संख्येत वाढ झाली असून राज्य रोजगारयुक्त करण्यासाठी कौशल्य विकास योजनेतून रोजगार निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू योजना राज्यात सक्षमपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कौशल्य विकास योजनेतून आतापर्यंत किती बेराजगारांना रोजगार देण्यात आला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) हे अंशत: खरे आहे.

"मेक इन इंडिया" या धोरणास अनुसरुन विविध उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळ पुरविण्याकरीता "प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना" व "प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान" राबविण्यात येते.

उपरोक्त दोन्ही योजना तसेच विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमातून राज्यातील उमेदवारांना कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करुन रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात येतो.

(२) कौशल्य विकास योजनेतून आतापर्यंत पुढीलप्रमाणे रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

१) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना २.० (Centrally Sponsored Centrally Managed - CSCM) अंतर्गत ४८,२४१ उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

२) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना २.० (Central Sponsored State Managed - CSSM) अंतर्गत १,७८३ उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

३) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत ७७,७९९ उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

४) दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत ९७,१५९ उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

५) किमान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत ७,४७८ उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

६) विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेतून सन २०१५ पासून आतापर्यंत एकूण ५,११,१९२ उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करण्यात आले आहे. यामधून मुल्यमापनामध्ये यशस्वी झालेल्या ३,४५,१४९ उमेदवारांपैकी १,८४,२१९ उमेदवारांना रोजगार/ स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शाळांत 'व्हर्च्युअल क्लासरूम' उभारण्याबाबत

**(३३) * २०८९ श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलत्या तंत्रज्ञानानुसार शिक्षण पध्दतीत बदल होणे आवश्यक असल्याने राज्यातील सर्व शाळांमध्ये ‘व्हर्च्युअल क्लासरूम’ उभारण्याबाबतचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाने सादर करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये ‘व्हर्च्युअल क्लासरूम” तयार करण्याचे काम कोणत्याही प्रकारची निविदा न मागविता व्हॅल्यूएबल एज्यूटेंमेट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला आतापर्यंत आठ वेळा मुदतवाढ देवून काम दिल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, सदरहू प्रस्तावाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी अंदाजे किती निधीची आवश्यकता आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील सर्व शाळांत ‘व्हर्च्युअल क्लासरूम’ उभारण्यासाठी कार्यवाही करुन उक्त प्रकरणात गैरव्यवहार झाल्याने संबंधित अधिकारी व ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच किती कालावधीत व्हर्च्युअल क्लासरुम तयार होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्प सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी प्रकल्पाचे परीरक्षण, प्रचालन व अद्यावतीकरण करण्यासाठी सन २०१७ व २०१८ मध्ये दोन वेळा निविदा प्रक्रिया राबविण्यात आली निविदाकाराना निविदा सादर करण्यासाठी चार-चार वेळामुदतवाढ देण्यात आली. परंतु प्रथम वेळेस एकही देकारदार प्रतिसादात्मक ठरला नाही. तसेच द्वितीय वेळेस प्रतिसाद न मिळाल्यामुळे निविदा रद्द करण्यात आली.

नविन कंत्राटदाराची नियुक्ती न होऊ शकल्याने ऑक्टोबर, २०१९ पर्यंत विद्यमान कंत्राटदारास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या मंजुरीन्वये मुदतवाढ देण्यात आली आहे. हे करताना प्रथम

टप्प्यात सहा वेळा व द्वितीय टप्प्यात पाच वेळा मुदतवाढ देण्यात आली.

(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका व्हीटीसी प्रकल्पाचे सर्व काम हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निधीतून करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पासाठी शासनाकडून कुठल्याही प्रकारचे अनुदान देण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात एमबीए अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांनी गैरमार्गाने प्रवेश घेतल्याबाबत

**(३४) * २१९९ श्री.विनायकराव मेटे, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमबीए अभ्यासक्रमात गैरमार्गाने प्रवेश झाल्याने प्रवेश नियामक प्राधिकरणाने शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये झालेल्या सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची पडताळणी केली असता २५ विद्यार्थ्यांनी गैरमार्गाने प्रवेश घेतल्याचे माहे नाव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत खोटी माहिती व बनावट कागदपत्रे सादर करून तसेच नावात बदल करून चुकीचे गुण दाखवून प्रवेश मिळविल्याचे निदर्शनास आले असून मागील ३ वर्षातही अशा प्रकारे प्रवेश घेतले असल्यास ते तपासण्यासाठी सीईटी सेलने एक समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीच्या तपासणीनंतर मागील वर्षी सुध्दा २९ विद्यार्थ्यांनी अशाच प्रकारे गैरमार्गाने प्रवेश घेतल्याचे निदर्शनास आल्याने यासंदर्भातील अहवाल प्रवेश नियामक प्राधिकरणाने तयार करून पुढील कार्यवाहीसाठी संचालकस्तरावर पाठविल्यानंतर केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरमार्गाने विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत संस्थांमधील अधिकारी/कर्मचारी यांचा सहभाग असल्यास त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये एमबीए अभ्यासक्रमास प्रवेशित एकूण २९ विद्यार्थ्यांनी एम्स टेस्ट फॉर मॅनेजमेंट ॲडमिशन्स (ATMA) या प्रवेश परीक्षेची बनावट गुणपत्रिका सादर करुन प्रवेश मिळविला असल्याचे आढळून आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये एमबीए अभ्यासक्रमासाठी २९ विद्यार्थ्यांनी प्रवेशावेळी सादर केलेल्या ATMA गुणपत्रिकांची असोसिएशन ऑफ इंडियन मॅनेजमेंट स्कूल (AIMS) यांच्याकडून सत्यता पडताळणी करुन घेण्यात आली व याबाबत २९ विद्यार्थी दोषी असल्याचे आढळल्याने या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची व त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ATMA Score Card प्रमाणपत्राची संकेतस्थळावरील सत्यता पडताळणीसाठी संबंधित परीक्षा घेणाऱ्या यंत्रणेच्या संकेतस्थळावरुन फेरतपासणी करण्याची यंत्रणा प्रवेशअर्ज स्वीकृती केंद्र व प्रवेश निश्चिती केंद्राना उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्याने सादर केलेली मूळ प्रमाणपत्रे सत्य आहेत असे समजून कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे अधिकारी-कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करता येत नाही.
(५) लागू नाही.

-----------------

## खेड-राजगुरूनगर ते जऊळके (जि.पुणे) येथे एसटी सेवा सुरु करण्याबाबत

**(३५) * २२३६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जऊळके (बोराडे) पो.रेटवडी (ता.खेड-राजगुरूनगर, जि.पुणे) गावासाठी असलेली खेड-राजगुरूनगर ते जऊळके ही एसटी सेवा बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एसटी सेवा बंद असल्याने तेथील गावकऱ्यांची गैरसोय होत असल्यामुळे उक्त एसटी सेवा बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर एसटी सेवा पुर्ववत सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) खेड-राजगुरुनगर ते जऊळके ही बससेवा रस्ता दुरुस्तीचे काम सुरु असल्याने तात्पुरती स्थगित ठेवण्यात आली होती, सद्य:स्थितीत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले आहे व सदरची बसफेरी दिनांक ३१/०१/२०२० पासून पूर्ववत सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवले चहातील मसाला पावडरमध्ये कृत्रिम रंगाचा वापर होत असल्याबाबत

**(३६) * २२८६ डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अन्न व औषध प्रशासनाने तपासणीसाठी ताब्यात घेतलेल्या येवले चहात वापरण्यात येणाऱ्या मसाला पावडरमध्ये “टारट्राझाईन” या कृत्रिम रंगाचा वापर होत असल्याचे केंद्र शासनाच्या म्हैसूर प्रयोगशाळेने दिलेल्या अहवालातून दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय अन्न सुरक्षा नियामक प्राधिकरणाच्या (एफएसएसएआय) नियमानुसार चहामध्ये रंगाच्या वापराला परवानगी नसतानाही येवले चहात वापरण्यात येणाऱ्या मसाला पावडरमधील कृत्रिम रंग आरोग्यास घातक असून त्यामुळे कर्करोगासारखे आजार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अन्न सुरक्षा मानकांनुसार नियमांचे पालन न करता अवैधरित्या चहाची विक्री करणाऱ्या येवले कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २१/०९/२०१९ रोजी मे.येवले फुड प्रॉडक्टस्, कोंढवा, पुणे या उत्पादक अन्न आस्थापनेची तपासणी करून, चहा पावडर, साखर, चहा मसाला (सुटा) व चहा मसाला (पॅक) या अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी ताब्यात घेतले.

विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आलेले चारही अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी राज्य आरोग्य प्रयोगशाळा पुणे येथे पाठविण्यात आले होते. प्रयोगशाळेतील अन्न विश्लेषकाने सदर चार नमुन्यांपैकी चहा पावडर, साखर व चहा मसाला (पॅक) या अन्न पदार्थांचे नमुने अन्न सुरक्षा व मानदे (पॅकेजींग व लेबलींग) नियमन, २०११ अंतर्गत विविध तरतुदींचे उल्लंघन करीत असल्याचे घोषित केले.

अन्न सुरक्षा व मानदे नियम, २०११ मधील तरतुद विचारात घेता, अन्न विश्लेषक यांचा अहवाल त्रुटीमय असल्याचे निदर्शनास आल्याने, सदरचे चारही अन्न पदार्थांचे नमुने दिनांक १३/११/२०१९ रोजी रेफरल फुड लॅबोरेटरी, म्हैसुर यांचेकडे फेरविश्लेषणासाठी पाठविण्यात आले होते. संचालक, रेफरल फुड लॅबोरेटरी, म्हैसुर यांनी त्यांच्या अहवालामध्ये चहा मसाला (सुटा) व चहा मसाला (पॅक) या अन्न पदार्थांच्या नमुन्यात "टारट्राझीन" हा सिथेंटीक कलर असल्याचे नमुद करून, सदर दोन्ही नमुने असुरक्षित असल्याचे घोषित केले. चहा मसाल्यामध्ये "टारट्राझीन" या सिंथेटीक फुड कलरचा वापर आरोग्यास घातक ठरतो.

चहा मसाला (सुटा) व चहा मसाला (पॅक) या दोन्ही असुरक्षित नमुन्यांप्रकरणी मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांच्या न्यायालयात दिनांक १७/०२/२०२० रोजी दोन स्वतंत्र खटले दाखल करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## होड्री (ता.भामरागड, जि.गडचिरोली) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शालेय पोषण आहार योजना सुरु करण्याबाबत

**(३७) * २३२३ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) होड्री (ता.भामरागड, जि.गडचिरोली) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत गत दोन-तीन महिन्यांपासून आदिवासी विद्यार्थ्यांचा मध्यान्ह पोषण आहार बंद करण्यात आल्याने आदिवासी विद्यार्थ्यांची उपासमार होऊ नये याकरीता 'समर्थन' संस्थेने शालेय पोषण आहाराची अंमलबजावणी करण्याबाबत शाळा व्यवस्थापन समिती व विद्यार्थ्यांच्या पालकांनी मा.शालेय शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, आदिवासी कल्याण विभाग, सचिव, महिला व बालकल्याण विभाग, अपर आयुक्त, आदिवासी कल्याण, जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, होड्री येथील जिल्हा परिषद शाळांमधील मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी निषेध व्यक्त करून स्वस्त धान्य दुकानातून धान्य खरेदी करून मध्यान्ह पोषण आहार सुरु ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त शालेय पोषण आहार योजना पूर्ववत सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर योजना सुरु करण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१९ महिन्यात पटसंख्येमध्ये २३ विद्यार्थ्यांची वाढ झाल्यामुळे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांनी स्वस्त धान्य दुकानातून २ क्विंटल तांदूळ व ५ किलो तूरडाळ खरेदी केली आहे.

(३) सद्य:स्थितीत संबंधित शाळांना पुरवठादाराव्दारे धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येत आहे. तसेच, सप्टेंबर-ऑक्टोबर या दोन महिन्यांसाठी स्वस्त धान्य दुकानातून खरेदी केल्याच्या मालाची देयके संबंधित शाळेस अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दादर, परळ, माटुंगा (दक्षिण व मध्य मुंबई) विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीची माहिती देण्याबाबत

**(३८) * २३८७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर, परळ, माटुंगा (दक्षिण व मध्य मुंबई) विभागातील अनेक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दरमहा भविष्य निर्वाह निधीची रक्कम वजा केली जाते परंतु संबंधित शिक्षकांना सन २०१४ ते २०२० पर्यंतच्या कालावधीची भविष्य निर्वाह निधीबाबतची माहिती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा झालेली रक्कम व्याजासह प्रत्येक कर्मचाऱ्यांना कळविणे आवश्यक असताना, दक्षिण-मध्य मुंबई शिक्षण निरीक्षक कार्यालयाने सन २०१४ पासून आजपर्यंतचा ६ वर्षाचा कोणताही तपशिल दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीच्या कपाती संदर्भातील विवरण न

दिल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द कारवाई करुन संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या कपातीबाबतची अद्यावत विवरण विनाविलंब देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२) व (३) दादर, परळ, माटुंगा विभागातील ८ शाळांमध्ये सन २०१४-२०२० या कालावधीमधील भविष्य निर्वाह निधी विवरणपत्र वाटप झालेले नाही. उर्वरित शाळांमध्ये सन २०१६-२०१७ पर्यंतच्या भविष्य निर्वाह निधी विवरण पत्राचे वाटप करण्यात आलेले आहे. शिक्षण निरीक्षक दक्षिण कार्यालयात अपूरे मनुष्यबळ तसेच सन २०१९-२०२० मध्ये लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी शिक्षण निरीक्षक कार्यालयातील एकमेव कार्यरत सहायक लेखाधिकारी यांची सेवा सहा महिने अधिग्रहित केल्यामुळे विहित कालावधीत विवरणपत्र वाटप करता येवू शकले नाही. सद्य:स्थितीत भविष्य निर्वाह निधी विवरणपत्र वाटपाचे काम मे, २०२० अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके ऑनलाईन करण्याबाबत

**(३९) * ११७५ श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या सेवेची नोंद मुख्याध्यापकाकडून सेवापुस्तकात केली जाते तसेच मुख्याध्यापकांनी केलेल्या सेवेची नोंद संस्थेमार्फत त्यांच्या सेवापुस्तकात केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सेवापुस्तक हे ऑनलाईन स्वरूपात असावे अशी मागणी शिक्षकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सेवापुस्तक ऑनलाईन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) अद्याप, सदर बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

## राज्यात ग्रंथालय विभागात बनावट प्रकल्पग्रस्तांची पद भरती केल्याबाबत

**(४०) * १२४७ श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्रंथालय विभागात पद भरतीमध्ये गैरमार्गाने ३ प्रकल्पग्रस्त उमेदवारांना नियुक्ती देण्यात आल्याने यासंबंधी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी आयोजित केलेल्या बैठकीत निर्देश देऊनसुध्दा कारवाई झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या नोकऱ्यांमुळे खऱ्या प्रकल्पग्रस्तांवर तसेच नियमित पदोन्नतीमध्ये संचालनालयातील कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याने त्यांना न्याय देण्याबाबत कार्यवाही करुन यास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २३/०५/२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांची अवैध भरती केल्याप्रकरणी तत्कालीन ग्रंथालय संचालक श्री.मो.भू.मेश्राम यांच्या सेवानिवृती वेतनात कायमस्वरुपी १० टक्के व तत्कालीन अधीक्षक श्री.वा.ना.भालेराव यांच्या सेवानिवृती वेतनात कायमस्वरुपी ५ टक्के कपात

करण्यात आली आहे. तसेच ग्रंथालय संचालनालयाच्या आस्थापनेवर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्ती करण्यात आलेल्या ३० प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करुन अहवाल सादर करणेबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय आय.टी.आय.मधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४१) * १६३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय आय.टी.आय.मध्ये अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या कार्यरत शिक्षकांवर अतिरिक्त पदाचा कार्यभार पडत असल्याने त्यांच्यात ताणतणाव निर्माण होऊन विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय आय.टी.आय.मध्ये रिक्त असलेली प दभरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत रिक्त असलेल्या शिक्षकीय पदांवर तासिका तत्वावरील शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.
(३) व (४) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध मंजूर करण्याबाबतची कार्यवाही वित्त विभागाच्या सल्ल्याने सुरु आहे. आकृतिबंध मंजूर झाल्यानंतर रिक्त पदे

भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. दरम्यानच्या कालावधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील सरळसेवेची रिक्त शिक्षकीय पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ०९/०६/२०१७ अन्वये गठीत उपसमितीसमोर सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना सेवाशर्ती व वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(४२) * ५५१ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयात काम करणाऱ्या ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना दरमहा अ-दर्जा ३०००, ब- दर्जा २६६७, क-दर्जा २०००, ड-दर्जा १२५० एवढया तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागत असल्याने त्यांना सेवाशर्ती व वेतनश्रेणी लागू करण्याबाबत ग्रंथालयीन संघटनेनी व लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना सेवाशर्ती व वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीसाठी येणाऱ्या मोठ्या आर्थिक भारामुळे तसेच प्रशासकीय अडचणीमुळे त्यांना वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करणे शक्य नाही. तथापि, शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानामध्ये वेळोवेळी वाढ करण्यात आली आहे. त्याप्रमाणात ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनातही वाढ झाली आहे.

-----------------

## राज्यात खाजगी संस्थामार्फत सुरु असलेल्या शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत

**(४३) * १००९ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४७७४१ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी संस्थामार्फत सुरु असलेल्या शाळांना पाचवा वेतन आयोगानुसार ५ टक्के वेतनेतर अनुदान देण्यात येत असून सदर रक्कम अत्यल्प असल्याने शाळांना शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा साहित्य खरेदी करता येत नसल्यामुळे त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीवर होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शाळांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतनेतर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) शासन निर्णय, दिनांक १९ जानेवारी, २०१३ नुसार शाळांना दिनांक १ एप्रिल, २००८ रोजी १०० टक्के अनुदानित शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन २००८ मध्ये पाचव्या वेतन आयोगानुसार ज्या टप्प्यावर वेतन अनुदान अनुज्ञेय होते, त्या टप्प्यावरील देय वेतन अनुदानास गोठवून त्याच्या पाच टक्के प्रमाणे वेतनेतर अनुदान (चार टक्के वेतनेतर अनुदान व एक टक्का इमारत भाडे/देखभाल अनुदान) अनुज्ञेय केले आहे. यातील चार टक्के तरतुदीतून शाळांना शैक्षणिक साहित्य व अन्य बाबींवरील खर्च करता येतो.

(२) याबाबत तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खटुआ समितीच्या अहवालातील शिफारशींबाबत

**(४४) * ९४ श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाडे नाकारणे, मनमानी पध्दतीने भाडे आकारणे यामुळे त्रस्त झालेल्या प्रवाशांना दिलासा देण्यासाठी आणि काळ्या-पिवळया रिक्षा, टॅक्सीसह ॲप आधारित टॅक्सीवर अंकुश ठेवण्यासाठी खटुआ समिती स्थापन करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये ३०० पानी अहवाल सादर केलेला असतानाही या अहवालातील शिफारशी शासनाने स्वीकारलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारशी न स्वीकारण्याची कारणे काय असून अहवालातील शिफारशीबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**ॲड. अनिल परब :** (१) शासनाने दिनांक १०/१०/२०१६ चे शासन निर्णयान्वये राज्यातील ऑटोरिक्षा/टॅक्सींचे भाडेदर सुत्र विहित करण्याकरीता श्री.बी.सी.खटुआ, संचालक, मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट युनिट यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समिती गठीत केली होती.

(२) व (३) सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक ०९/१०/२०१७ रोजी शासनास सादर केला असून सदर बाब शासनाच्या कार्यवाहीखाली आहे.

-----------------

## शिवनेरी व अश्वमेध बसच्या तिकीट दरात कपात करण्याबाबत

**(४५) * ६३१ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणेसह सात मार्गावरील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शिवनेरी व अश्वमेध म.रा.प.म. बसच्या तिकीट दर कपातीचा निर्णय शासनाने घेतल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसच्या उर्वरित मार्गावरही तिकीट दर कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळाच्या शिवेनरी या बससेवेचे प्रवासभाडे दिनांक ०८/०७/२०१९ पासून प्रायोगिक तत्वावर कमी करण्यात आले आहे. मात्र सदर निर्णयाचे अपेक्षित परिणाम प्रवासी उत्पन्न वाढीत झालेले नाही, अशा स्थितीत अन्य सेवाप्रकाराची भाडेकपात करणे आर्थिकदृष्टया महामंडळाच्या हितावह नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४६) * ४४४ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये, शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी संस्थांमध्ये प्राध्यापकांच्या ११ हजार पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर त्याचा परिणाम होत असून सदर पदे दिनांक १० नोव्हेंबर, २०१९ पूर्वी भरण्यात याव्यात, असा आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) राज्यातील विद्यापीठांना दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राध्यापकांची पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच प्राध्यापकांची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत, सदरहू पदे केव्हापर्यंत भरण्यात येणार आहेत व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) राज्यातील सर्व विद्यापीठे, शासकीय/अशासकीय अनुदानित मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्थांमधील सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करून सद्यःस्थितीची माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेतस्थळावरील पोर्टलमध्ये दिनांक १०/११/२०१९ पूर्वी भरण्याच्या सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक २२/१०/२०१९ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना शासनाच्या दिनांक ०७/११/२०१९ च्या पत्रान्वये सर्व विद्यापीठांचे कुलसचिव व संचालक (उच्च शिक्षण) यांना देण्यात आलेल्या आहेत.

वित्त विभागाच्या दिनांक २५/०५/२०१७ च्या शासन निर्णयान्वये काही अटी व शर्तींच्या अधीन राहून पद भरतीवर निर्बंध आहेत. तथापि, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन, सहायक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाच्या दिनांक ०३/११/२०१८, दिनांक ०७/०८/२०१९ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक ०७/०९/२०१९ च्या पत्रान्वये शिक्षकीय व शिक्षकेतर पदे भरण्यावरील निर्बंध उठवून पद भरती करणेस काही अटी व शर्तींच्या अधीन राहून वित्त विभागाच्या सहमतीने शासन मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पदभरतीची प्रक्रिया सुरू आहे.

-----------------

## कांदिवली (चारकोप) मुंबई येथे तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील वसमत शहरात प्लास्टिकची अंडी विक्री होत असल्याबाबत

**(४७) * १०९६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (पश्चिम), चारकोप, मुंबई येथे तरुणांनी प्लास्टिकची अंडी घेवून जाणारे दोन टेम्पो पकडल्याचे तसेच वसमत (जि.औरंगाबाद) शहरात प्लास्टिकच्या अंड्यांची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दोन टॅम्पोमध्ये सुमारे ४ हजार भेसळयुक्त प्लास्टिकची अंडी सापडल्याने याबाबत पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली असून अंड्यात प्लास्टिकयुक्त पदार्थ आढळल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार प्लास्टिकच्या अंड्यांची विक्री करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) कांदिवली (पश्चिम), चारकोप, मुंबई येथे तरुणांनी संशयित अंडी घेवून जाणारे दोन टेम्पो पकडले होते. सदर जप्त केलेल्या अंड्यापैकी विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या अंड्याचा अहवाल प्रमाणित आला असून, त्यामध्ये प्लास्टिक पदार्थ नसल्याचे आढळून आले आहे.

वसमत (जि.औरंगाबाद) शहरात प्लास्टिकच्या अंड्यांची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) चारकोप येथे संशयावरून पकडण्यात आलेल्या टेम्पोमधुन अंड्याचा एक नमुना अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी विश्लेषणासाठी घेतला होता. विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या सदर अंड्याचा नमुना प्रमाणित असल्याचा अहवाल अन्न चाचणी प्रयोगशाळेने दिला आहे. तसेच सदर अंड्यामध्ये प्लास्टिक पदार्थ नसल्याचे अभिप्राय अन्न विश्लेषक, मुंबई यांनी दिले आहेत. अन्न व औषध प्रशासनाकडून सन २०१८ पासून आजतागायत अंडी या अन्न पदार्थांचे एकूण ४७ औपचारिक व अनौपचारिक नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. त्यापैकी विश्लेषणाअंती २१ नमुने प्रमाणित असल्याचे घोषित झाले आहे. तर २६ नमुन्यांचा अहवाल प्रलंबित आहे. राज्यात आजपर्यंत कोठेही प्लास्टिकच्या अंड्याची विक्री होत असल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महिला प्रवाशांसह अन्य प्रवाशांसाठी असलेली हेल्पलाईन पुन्हा सुरु करण्याबाबत

**(४८) * १९४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आरटीओने महिला प्रवाशांसह अन्य प्रवाशांना आणीबाणीच्या वेळी तातडीने मदत मिळण्याकरीता सुरु केलेली हेल्पलाईन क्रमांक १८००२२५३३५ गत दोन वर्षापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रात्री अपरात्री महिलांचा प्रवास घातक ठरत असून मुजोर रिक्षा चालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच ठाणेकर महिलांच्या सुरक्षेच्यादृष्टीने विभागाने वेळीच जाणीवपूर्वक योग्य ती पावले उचलली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिलांच्या अपहरणाच्या घटना, त्यांच्याशी गैरवर्तणूक व उध्दट वागण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सदर हेल्पलाईन क्रमांक सुरु न करण्याच्या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच, सदरहू हेल्पलाईन बंद होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू बंद असलेली हेल्पलाईन कायमस्वरूपी सुरु राहण्यासाठी कार्यवाही करुन कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) होय.
(२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे हे कार्यालय दिनांक १६/०८/२०१९ पासून नवीन जागेमध्ये स्थलांतरीत झाले आहे. स्थलांतरानंतर सदर हेल्पलाईन नंबर एमटीएनएल विभागाकडून दिनांक ०९/०१/२०२० रोजी कार्यान्वित करण्यात आला. तथापि, तांत्रिक कारणांमुळे उक्त सेवा पुन्हा बंद झाली आहे.

टोल फ्री क्रमांकासाठी आवश्यक असणारी आय.व्ही.आर.एस. यंत्रणा ही कालबाह्य व दुरुस्त न होणारी असल्याने आवश्यक यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करून नवीन आय.व्ही.आर.एस. यंत्रणा खरेदी करण्यात येईल.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ओला दुष्काळग्रस्त आणि पुरबाधित जिल्हयातील विद्यार्थ्यांचे वसतिगृह शुल्क माफ करण्याबाबत

**(४९) * ५५७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ओला दुष्काळग्रस्त आणि पुरबाधित जिल्हयांतील विद्यार्थ्यांचे वसतिगृह शुल्क माफ करण्याचे आदेश आणि शैक्षणिक शुल्क माफ करण्याचा प्रस्ताव मुंबई विद्यापीठाने शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगावच्या भादली गावातील इयत्ता १२ वीची विद्यार्थीनी यामिनी पाटील हिने शुल्क भरण्यास पैसे नसल्याने विष प्राशन करून आत्महत्या केल्याने मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी उपरोक्त जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे वसतिगृह शुल्क माफ करण्याबाबत आंदोलने केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ओला दुष्काळग्रस्त आणि पुरबाधित जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे वसतिगृह शुल्क व शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) दुष्काळ परिस्थिती तसेच “क्यार” व “महा” चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसामुळे नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत दिनांक २१ नोव्हेंबर, २०१९ व दिनांक २२ नोव्हेंबर, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध शहरात अनेक इंटिग्रेटेड महाविद्यालये नियमांचे उल्लंघन करीत असल्याबाबत

**(५०) * ३४२ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध शहरात अनेक इंटिग्रेटेड महाविद्यालये नियमांचे उल्लंघन करून सुरु असून या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदाने, लॅब, शौचालये यांची सोय नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत दुर्लक्ष होत असून विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क वसूल करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सुरु असलेल्या इंटिग्रेटेड महाविद्यालयांची शासनाकडून पाहणी करण्यात आली आहे काय, पाहणीत काय निदर्शनास आले,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात बेकायदेशीररित्या सुरु असलेल्या महाविद्यालयांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता संचालक तसेच सदर महाविद्यालयांना परवानगी देणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ नुसार नवीन शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास परवानगी देण्याची तसेच, विद्यमान शाळेची दर्जावाढ करण्याची तरतूद आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार जमीन व इतर विहित अटी व निकषांची पुर्तता करणाऱ्या कोणत्याही संस्थेस शासनाची परवानगी घेऊन शाळा सुरू करता येते. शाळांमध्ये भौतिक सुविधेबाबतचे निकष शासन निर्णय, दिनांक २९ जून, २०१३ अन्वये विहित केले आहेत. तसेच, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार व्यवस्थापनाकडून शुल्क आकारण्यात येते.
(३) काही कनिष्ठ महाविद्यालयांना परवानगी दिल्याप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.२३३१/२०१९ दाखल झाली आहे. त्यानुषंगाने संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची पथकामार्फत पाहणी करण्यात आली असून अनुषंगिक कार्यवाही सुरू आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील माध्यमिक/ उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांना शिक्षकांचे पद देण्याबाबत

**(५१) * ७१९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालये (संलग्न वरीष्ठ महाविद्यालय) मधील सेवेतील कार्यरत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधून अध्याननाकरीता शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना संस्थेच्या शाळांमध्ये २५ टक्के शिक्षकांचे पद देण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे यांनी दिनांक २३/१०/२०१९ व दिनांक ३०/१०/२०१९ रोजी योग्यत्या शिफारशींसह अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडे पाठविलेला असून प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांच्या दिनांक १८/०६/२०१९ च्या निर्णयानुसार कायद्यामध्ये आवश्यक तो बदल करण्याकरीता नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना दिनांक २५/१०/२०१९, दिनांक ११/११/२०१९ व दिनांक ०३/१२/२०१९ रोजी पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त प्रकरणी केव्हापर्यंत निर्णय घेण्यात येणार आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उचित कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठाचे अनुदान शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(५२) * १०८४ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत मुंबई विद्यापीठास दरवर्षी विद्यापीठाच्या विकास कामासाठी विविध प्रकारचे अनुदान देण्यात येत असून मुंबई विद्यापीठास मागील वर्षी देण्यात आलेल्या अनुदानाच्या रक्कमेपैकी शासनाकडे रुपये २७.९८ कोटी प्रलंबित असल्याचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाला बाळासाहेब ठाकरे अध्यासन, राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान, माय मराठी प्रकल्प अशा विविध प्रकल्पांचे अनुदान शासनाने दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार मुंबई विद्यापीठाने केलेल्या मागणीनुसार प्रलंबित अनुदानाची रक्कम मुंबई विद्यापीठास देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) मुंबई विद्यापीठाच्या विकास कामांकरीता रुसा (राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान) अंतर्गत व शासनाकडून एकूण रुपये ३०.६६ कोटी अनुदान मंजूर करण्यात आले असून आतापर्यंत त्यापैकी रुपये १७.७० कोटी एवढी अनुदानाची रक्कम विद्यापीठास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच मुंबई विद्यापीठात माय मराठी प्रकल्पासाठी रुपये १.८० कोटी अनुदान मंजूर करण्यात आले होते. त्यापैकी रुपये १,३१,७२,७०० अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

अ) मुंबई विद्यापीठाच्या प्रो.बाळ आपटे सेंटर फॉर स्टडीज इन स्टुडंटस अ‍ॅण्ड युथ मुव्हमेंट या केंद्रासाठी रुपये २५.०० कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे. त्यापैकी रुपये ६.०० कोटी या केंद्रास वितरीत करण्यात आले आहेत.

ब) मा.श्री.बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्राकरीता रुपये ५.०० कोटी निधी मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानुसार या अध्यासन केंद्रास रुपये १.०० कोटी वितरीत करण्यात आले आहेत.

क) 'रुसा' व 'माय मराठी प्रकल्पांचे' अनुदान निधी उपलब्धतेनुसार वितरीत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बॅचलर ऑफ व्होकेशनल अभ्यासक्रमास मान्यता मिळणेबाबत

**(५३) * २०३ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाने नॅशनल स्कील कॉलीफीकेशन फ्रेमवर्क (NSQF) अंतर्गत विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास करण्यासाठी राज्यात विविध महाविद्यालयांना बॅचलर ऑफ व्होकेशनल (B.VOC) या तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम सन २०१९-२०२० पासून सुरु करण्यास मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभ्यासक्रमासंबंधित महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग आर्थिक मदत करीत असल्याने शासनास कोणत्याही प्रकारचा आर्थिक भार येत नसून संबंधित विद्यापीठ संस्थांना सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नीकरण देऊन मान्यतेसाठी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावास वेळेवर मान्यता मिळत नसल्याने मान्य असलेले अभ्यासक्रम सुरु करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन योग्य तो निर्णय घेऊन अभ्यासक्रमास मान्यता देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय.
(२) व (३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९(७)(ख) नुसार कोणतेही व्यवस्थापन राज्य शासनाच्या पुर्वपरवानगीखेरीज कोणतेही नवीन अभ्यासक्रम/पाठयक्रम/विषय/विद्याशाखा किंवा अतिरिक्त तुकडी सुरू करणार नाही अशी तरतूद आहे. सदरहू अभ्यासक्रम हे शासनाची पूर्व मान्यता न घेता सुरू केलेले आहेत. त्यामुळे शासनाने वेळेवर मान्यता दिली नाही, अशी वस्तुस्थिती नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या बी.व्होक अभ्यासक्रमांचे प्रस्ताव विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठामार्फत शासनाच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर केल्यानंतर त्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. विद्यापीठ अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाच्या मान्यतेशिवाय किंवा मान्यतेच्या अधीन राहून कोणताही नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येऊ नये, अशा सूचना सर्व विद्यापीठांना दिनांक १५/०६/२०१९ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अवैधरित्या गुटख्याची विक्री होत असल्याबाबत

**(५४) * १०४९ श्री.रामदास कदम, श्री.विप्लव बाजोरिया, श्री.विनायकराव मेटे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७३३४ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) शहर व तालुक्यात अवैध गुटखा विकला जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच राज्यात तंबाखूजन्य पदार्थ व गुटखाबंदी असतानाही हिंगोली, बीड जिल्हयात व इतर ग्रामीण व शहरी भागात पानटपरी, दुकानात राजरोसपणे गुटखा विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण व शहरी भागात संबंधित विभागाने सन २०१९ मध्ये तंबाखूजन्य पदार्थ व गुटखा विक्री करणाऱ्या पानटपरी व दुकानांवर कारवाई करुन गुटखा जप्त केला, तसेच शासनाने अनेक महिन्यांपूर्वी तंबाखूजन्य पदार्थ व गुटखा बंदी जाहीर केली असून संबंधित विभागाने त्याबाबत अंमलबजावणी न केल्यामुळे पानटपरीवाले व दुकानदार राजरोसपणे तंबाखूजन्य पदार्थ व गुटखा विक्री करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगोली जिल्हयात शाळा महाविद्यालय परिसरात १०० मीटर अंतरावर गुटखा अथवा मादक पदार्थ विक्री करण्यास प्रतिबंध असतानाही जिल्हयातील पानटपऱ्यापासून ते किराणा दुकानापर्यंत अवैधरित्या गुटख्याची विक्री होत असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, बीड जिल्हयामध्ये अवैध गुटख्यावर कारवाई करण्यात आल्यानंतर कारवाईमध्ये पकडण्यात आलेल्या गुटख्यासंबंधी अन्न व औषध प्रशासनामधील कर्मचारी संबंधित व्यापारास संपर्क साधून व्यापाऱ्यामार्फत आर्थिक व्यवहार करुन गुटख्याची पुन्हा बाजारामध्ये विक्री करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्यादृष्टीने अवैधरित्या सुरु असलेली गुटखा विक्री रोखून १०० टक्के गुटखा बंदी करण्याबाबत कार्यवाही करून गुटखा विक्रेत्यांवर व गुटखा बंदीच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या तसेच गुटखा विक्रेत्यांना पाठीशी घालणाऱ्या प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) सांगोला, जि.सोलापूर येथे अन्न व औषध प्रशासनातील अधिकारी व पोलिसांनी दिनांक २५/११/२०१९ रोजी संयुक्तपणे कारवाई करून प्रतिबंधित अन्न पदार्थांची वाहतूक करणारे वाहन पकडले होते. सदर वाहनातुन रुपये ४,३६,५९०/- रूपयांचा प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

माहे जानेवारी, २०२० मध्ये हिंगोली व बीड जिल्हयात व इतर शहरी भागात गुटखा विक्री होत असल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अशा प्रकारची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) हे खरे नाही.

(५) अन्न सुरक्षा आयुक्त यांच्या दिनांक १९ जुलै, २०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये गुटखा तसेच अन्य पदार्थांच्या विक्री वितरण व वाहतुकीवर १ वर्षासाठी बंदी घालण्यात आलेली आहे. सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने राज्यात गुटखाबंदी आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने अन्न व औषध प्रशासनाव्दारे वेळोवेळी धाडी व जप्तीची कारवाई करण्यात येते. सदर कारवाई दरम्यान दोषी आढळलेल्या व्यक्तींविरूध्द अन्न सुरक्षा मानदे अधिनियम व भारतीय दंड विधानातील कलमांन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अल्पसंख्यांक विद्‌यार्थ्यांना सुधारीत दराप्रमाणे विद्‌यावेतन मिळण्याबाबत

**(५५) * ९४१ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अमरावती, कोल्हापूर या ठिकाणी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण सुरू असून खुल्या प्रवर्गातील विद्‌यार्थ्यांना रूपये ४०००/- तर अनुदानित प्रवर्गातील विद्‌यार्थ्यांना रूपये ७०००/- दरमहा विद्‌यावेतन देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सुधारीत दराप्रमाणे विद्यावेतन न देता निवास व भोजन भत्त्याकरीता दरमहा रूपये २०००/- देण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांकडून रक्कम वाढवून देण्याबाबत मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सुधारीत दराप्रमाणे विद्यावेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) अल्पसंख्यांक समुहातील विद्यार्थ्यांना सुधारीत दराने विद्यावेतन देण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यातील आय.टी.आय.मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

**(५६) * २३५ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४१२७६ ला दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयटीआयमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मागील अनेक वर्षापासून केवळ रुपये ४०/- विद्यावेतन देण्यात येत असून सध्याच्या महागाईच्या काळात सदर विद्यावेतन अत्यल्प असल्याने विद्यार्थ्यांकडून विद्यावेतनात वाढ करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील एकूण प्रशिक्षणार्थ्यांपैकी आर्थिकदृष्टया मागास असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ४०/- तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रुपये ६०/- याप्रमाणे देण्यात येत असलेल्या विद्यावेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याच्या प्रस्तावाबाबत आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सहमती दर्शविली आहे. तथापि, अल्पसंख्यांक विकास विभाग व विमुक्त जाती व भटक्या जमाती, विमाप्र, इ.मा.व. कल्याण विभागाचे अभिप्राय घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

सर्व विभागांचे अभिप्राय प्राप्त करुन नियोजन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेनंतर मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## वाडा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड सायन्स महाविद्यालयामधील अनेक विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण विद्यापीठाकडे पाठविले नसल्याबाबत

**(५७) * २१६० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड सायन्स (जि.पालघर) महाविद्यालयाने कु. सचिन सुतार या आदिवासी विद्यार्थ्याचे सन २०१७ पासून अंतर्गत गुण विद्यापीठाकडे पाठविले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षेचे अंतर्गत गुण पाठविले नसल्याने सदर विद्यार्थी पदवी परीक्षा पास होऊनही त्याला प्रमाणपत्र दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंतर्गत गुण न पाठविणाऱ्या संबंधित कर्मचारी/शिक्षक/प्राध्यापक/नियंत्रकावर कारवाई करुन आदिवासी विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर विद्यार्थी एप्रिल, २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या बी.एस्.सी. आय.टी. सत्र ५ व सत्र ६ या दोन्ही परिक्षेकरीता प्रविष्ट झाला होता. सदर विद्यार्थी या परिक्षेमध्ये सत्र ६ मध्ये उत्तीर्ण झाला. परंतु सत्र ५ साठी घेण्यात आलेल्या महाविद्यालयाच्या अंतर्गत परिक्षेमध्ये अनुपस्थित असल्याने सत्र ५ मध्ये अनुत्तीर्ण झाला आहे.

सदर विद्यार्थी पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेला नसल्याने त्याला पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले नाही.

महाविद्यालयाकडून सदर विद्यार्थ्याचे सत्र ५ चे महाविद्यालयीन अंतर्गत परिक्षेचे गुण प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाच्या नियमानुसार या विद्यार्थ्याचा निकाल जाहीर करण्यात येईल. तसेच त्यानंतर येणाऱ्या पदवी समारंभानंतर या विद्यार्थ्यास पदवी प्रदान करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनधिकृत स्कूल व्हॅन व बसगाड्यांवर कारवाई करण्याबाबत

**(५८) * २१०५ श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रविंद्र फाटक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत स्कूल बस चालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होत असून स्कूल बसेसमधून सुमारे १७ हजार ५३१ बेकायदा विद्यार्थी वाहतूक होत असल्याने राज्य परिवहन विभागाने अनधिकृत स्कूल व्हॅन व बसगाड्यांची तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजीपर्यंत पाठविण्याचे आदेश परिवहन आयुक्तांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात रिक्षा, टॅक्सीमधून बेकायदा विद्यार्थी वाहतूक होत असल्याने अनधिकृत स्कूल व्हॅन व बसगाड्यांवर कारवाई करुन बेकायदेशीर वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त आदेशान्वये किती अनधिकृत स्कूल व्हॅन व बसगाड्यांची तपासणी करण्यात आली, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) होय.

परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दिनांक ०६/०१/२०२० च्या कार्यालयीन आदेशाद्वारे राज्यातील अनधिकृत स्कुल व्हॅन व बसेसवर कार्यवाही करण्याकरीता विशेष तपासणी मोहिम राबविण्याबाबत आदेश जारी करण्यात आलेले आहेत.

(२) वरील आदेशानुसार राबविण्यात आलेल्या मोहिमेमध्ये राज्यात ३३५ स्कुल बस व विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या ३०२ अन्य वाहनांविरुध्द कारवाई करण्यात आली. यामध्ये ८६ वाहने जप्त करण्यात आली असून रुपये ९,६६,७००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

तसेच अनधिकृत स्कुल व्हॅन व बस गाड्यांविरुध्द वायुवेग पथकांमार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येत असून दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३१/०१/२०२० या कालावधीत विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या एकूण ५,८१० वाहनांविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. सदर कारवाईतून रुपये १,७५,६०,७६०/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील नद्या प्रदूषणमुक्त करण्याबाबत

**(५९) * २२८८ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळाने माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये जाहीर केलेल्या पाणी गुणवत्ता व स्थिती अहवालामध्ये नागपूर शहरातील नद्या आणि त्यांचे जलस्त्रोत सर्वाधिक प्रदूषित असल्याची नोंद माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरातून वाहणाऱ्या नाग व पिली नद्यांमध्ये शहरातील सांडपाणी तसेच कंपन्यांचे रसायनयुक्त पाणी सोडल्याने नद्यांचा जलस्तर प्रदूषित होऊन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे अनेकवेळा तक्रारी करुनही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर शहरातील नद्यांचे प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) नागपूर शहराच्या हद्दीतून प्रक्रियाकृत अथवा काही प्रमाणात विनाप्रक्रिया घरगुती सांडपाणी मिसळल्यामुळे शहरातून वाहणाऱ्या नदयांच्या पाण्याची गुणवत्ता काही प्रमाणात खालावलेली आढळून येते, हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

नदीमध्ये उद्योगामधून निर्माण होणा-या सांडपाणी सोडण्यास निर्बंध घालण्यात आलेले आहेत व अशाप्रकारे विचाराधीन नद्यांमध्ये रासायनिक सांडपाणी सोडत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

नागपूर शहरातील नागनदी प्रदूषण निर्मुलनाबाबत नागपूर महानगरपालिकेने आराखडा तयार केला असुन केंद्र शासनाने प्रकल्पास रक्कम रुपये १२५२.३३ कोटीची दि. १४ जून, २०१६ रोजी तत्वत: मान्यता दिली आहे. केंद्र शासन ६०% राज्य शासन २५% मनपा सहभाग १५% असा

आकृतिबंध आहे. वित्तीय सहाय्याकरीता “जायका” हया जपानच्या संस्थेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. यामध्ये उत्तर व मध्य शहरातील सांडपाण्याचे संकलन व प्रक्रिया (८२ द.ल.लि.) अंतर्भूत आहे.

त्याचबरोबर, नागपूर महानगरपालिकेने शासनाच्या अमृत योजनेंतर्गत १३० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया केंद्र प्रस्तावित केले असुन त्यासंबंधी रक्कम रुपये ७६९.७३ कोटी खर्चाचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे सादर केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डीसीपीएस व फंडाची खाती नसलेल्या शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाचा फरक रोखीने देणेबाबत

**(६०) * ११६२ श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.किशोर दराडे, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजीपासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजीपासूनचे वेतन रोखीने देण्यात आले असून दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंतची थकबाकी पाच समान हप्त्यांमध्ये रोखीने देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हप्त्याची पहिली रक्कम डीसीपीएसधारक शासकीय कर्मचारी यांना रोखीने देण्यात आली असून शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय नसल्याने या खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील डीसीपीएसधारक शिक्षकांना सातवा वेतन आयोगाचा पहिला हप्ता देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन ज्या शिक्षकांची डीसीपीएस खाती आहेत व ज्या शिक्षकांना कोणतीही फंडाची खाती नाहीत तसेच २० टक्के वेतन अनुदान घेत असलेल्या शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाचा फरक रोखीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) राज्यातील खाजगी अनुदानित शाळामधील या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना दिनांक ०१/०१/२०१६ ते ३१/१२/२०१८ या कालावधीमधील थकबाकीची रक्कम रोखीने पाच समान हप्त्यात देणेबाबतचा शासन निर्णय, दिनांक १०/०१/२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठी अनिवार्य खर्चाच्या लेखाशिर्षाखालील १०० टक्के निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्याची व ७ व्या वेतन आयोगाचा फरकाचा पहिला हप्ता शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना अदा करण्यासाठी कमी पडणारी रक्कम पुनर्विनियोजनाने उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कनिष्ठ महाविद्यालयांना वैयक्तिक मान्यता देवून अनुदानास पात्र ठरविण्याबाबत

**(६१) * १२६२ श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक कनिष्ठ महाविद्यालयांना वैयक्तिक मान्यता नसल्यामुळे महाविद्यालये अनुदानास प्राप्त ठरत नसून उपसंचालक कार्यालय हेतूपुरस्सरपणे अशा महाविद्यालयांना मान्यता देताना अनेक अडचणी निर्माण करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जाहिरात परवानगी असताना सुध्दा ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळ पुसद द्वारा संचालित रामभाऊ कोस्लांगे कनिष्ठ महाविद्यालय, पोखरी (ता.महागाव, जि.यवतमाळ) यांना वैयक्तिक मान्यता देऊन अनुदानाच्या पात्रतेतून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयाने ज्या विद्यार्थ्यांच्या नियुक्त्या पोर्टल लागू होण्यापूर्वी केल्या आहेत, त्या महाविद्यालयांना वैयक्तिक मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) विभागीय उपसंचालक, अमरावती यांचेस्तरावरुन नियुक्त शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सहशिक्षक पदाचे मानधन वाढविण्याबाबत

**(६२) * ८० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय व निमशासकीय शाळेतील नवनियुक्त शिक्षकांना तीन वर्षे सहशिक्षक म्हणून रुपये ६०००/-, रुपये ७०००/- व रुपये ८०००/- इतके मानधन दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू केल्याने उक्त शिक्षकांचे मानधन वाढविण्याबाबत मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सहशिक्षक पदाचे मानधन वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) अद्याप, शासनस्तरावर सदर बाब विचाराधीन नाही.

-----------------

## राज्यातील अकृषी विद्यापीठातील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(६३) * ४६६ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १२ अकृषी विद्यापीठासह तीन अभिमत विद्यापीठामधील १ हजार १६६ पदांपैकी ६५९ प्राध्यापकांच्या पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत उच्च शिक्षण संचालक यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांना पत्र पाठवून सुधारीत बिंदूनामावलीनुसार प्राध्यापकांची भरती प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावास मंजूरी देवून रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९ अन्वये अकृषी व अभिमत विद्यापीठाच्या मंजूर संख्येच्या ८०% इतक्या मर्यादेत पद भरती करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) शासनाकडे सुधारीत बिंदुनामावलीनुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक या विद्यापीठांच्या प्राप्त प्रस्तावांना मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित विद्यापीठांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यांनतर त्यास मंजूरी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## "महास्वयंम" या शासकीय वेबपोर्टलवर बीड येथील बोगस संस्थानी कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या अनुदानाचा अपहार केल्याबाबत

**(६४) * ६० श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सर्व कौशल्य विकास योजना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता विकास केंद्रामार्फत पार पाडल्या जात असून या सर्व कामासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता विकास केंद्रे 'महास्वयंम' या शासकीय पोर्टलवरून जोडण्यात आली असून सदरचे पोर्टल हे 'सिल्वरटच' संस्थेव्दारे बनविण्यात आल्याने त्याचे समायोजन देखील त्यांच्याकडून करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौशल्य विकास योजनांचा लाभ घेणाऱ्या शासकीय किंवा खाजगी संस्थांनी या पोर्टलवर संस्थेची नोंदणी करुन संस्थेची माहिती, संस्थेद्वारे दिले जाणाऱ्या प्रशिक्षण संस्थेची जागा व पायाभूत सुविधांची माहिती दिल्यावर शासनामार्फत त्याची तपासणी केल्यानंतर प्रशिक्षण घेणाऱ्या प्रति विद्यार्थी रुपये १५ हजाराचे मानधन देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निधी मिळविण्यासाठी दिनांक ४ नोव्हेंबर, २०१९ रोजी बीड जिल्हयातील अस्तित्वात नसलेल्या १० बनावट संस्थांनी पोर्टलच्या कंत्राटदाराशी संगनमत करुन बनावट केंद्रे उघडून शासनाची फसवणूक केल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्याने संबंधित संस्थाविरुध्द महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबईच्यावतीने आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोगस संस्थांची नोंदणी करुन कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या अनुदानाचा अपहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या “महास्वयंम” या पोर्टलचे संपूर्ण कामकाज ऑनलाईन पध्दतीने https://kaushalya. mahaswayam.gov.in/ या वेबपोर्टलवर केले जाते. सदर पोर्टलचे व्यवस्थापन सिल्वर टच टेक्नॉलॉजी लिमिटेड (खाजगी) या निक्सी सूचीबध्द संस्थेमार्फत केले जाते.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पहिली बातमी (FIR) दिनांक ०९/१२/२०१९ रोजी आझाद पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडे करण्यात आली आहे.

(४) होय.

बीड जिल्हयातील बोगस १० प्रशिक्षण संस्थांची नोंदणी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्या दिनांक १४/११/२०१८ च्या आदेशान्वये रद्द करण्यात येवून सदर १० संस्थांचा समावेश काळया यादीत करण्यात आला आहे. या संस्थांना कोणतेही अनुदान वितरीत करण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(६५) * ६५२ आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक ४७९९५ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील 'शालार्थ' प्रणालीच्या तांत्रिक अडचणींकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे ७ हजार शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) शासन निर्णय, दिनांक १८/०७/२०१९ अन्वये ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शालार्थ क्रमांक देण्यात आलेला नाही त्यांचे डिसेंबर, २०१९ पर्यंतचे वेतन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली होती. या कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याच्या सूचना शिक्षण संचालक यांनी सर्व संबधितांना दिनांक ७ व ८ जानेवारी, २०२० रोजी दिलेल्या आहेत. सद्य:स्थितीत ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना अद्याप शालार्थ क्रमांक मिळालेला नाही त्यांचे मार्च, २०२० पर्यंतचे वेतन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास शासन निर्णय, दिनांक १४/०२/२०२० अन्वये मान्यता दिलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील पाणी पुरवठ्यासाठी जलसंजाल योजना राबविण्याबाबत

**(६६) * १५९१ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील दुष्काळी भागाची पाण्याची तीव्रता कमी होण्यासाठी मराठवाडा विभागात "मराठवाडा जलसंजाल" नावाने रुपये १६ हजार कोटींची बंद नळ पाणीपुरवठा योजना माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, उक्त योजनेमुळे मराठवाड्यातील ११ प्रमुख धरणे जोडली जाणार असून इस्त्रायलची मेकोरोट ही राष्ट्रीय पाणीपुरवठा कंपनी यात सल्लागार असल्याने सन २०५० पर्यंतच्या पाण्याची गरज निश्चित करुन आराखडा तयार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे, इस्त्रायलच्या मेकोरोट कंपनीस कोणत्या अटी निश्चित करण्यात आल्या आहेत, तसेच उक्त योजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारा निधी कशाप्रकारे किती कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, सदरहू योजना केव्हापासून कार्यान्वित करण्यात येणार आहे व यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाड्यातील पाणी पुरवठ्यासाठी जलसंजाल योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद, जालना, बीड, लातूर व उस्मानाबाद या जिल्ह्यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्राथमिक संकल्पन अहवालानुसार एकूण रूपये १२२१७ कोटींच्या ढोबळ किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मराठवाड्यातील ११ प्रमुख धरणातून ८ जिल्ह्यात पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी पिण्याच्या पाण्याची ग्रीड तयार करणेसाठी योजना तयार करण्यात आली आहे. मेकोरोट कंपनीने मराठवाड्यात उपलब्ध पाण्याचा अभ्यास करुन विविध ६ अहवाल व १० प्राथमिक संकल्पन अहवाल सादर करावयाचे आहेत. यानुषंगाने आतापर्यंत ४ अहवाल प्राप्त असून ५ प्राथमिक संकल्पन अहवाल प्राप्त आहेत. प्राप्त ५ प्राथमिक अहवालानुसार राज्य शासनाने इच्छुक संस्थांकडून RFQ मागविण्यात आले आहेत. यात शासन व विकासक या भागीदारीने निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

(४) औरंगाबाद, बीड, जालना, लातूर व उस्मानाबाद या जिल्ह्यांसाठी HAM आधारित RFQ साठी निविदेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षकांना नव्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्याबाबत

**(६७) * १५३२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण विभागाने शिक्षकांना नविन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण न दिल्याने खाजगी संस्था संघटनांनी प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली असून त्यामध्ये खाजगी प्रकाशनाची गाईड्स आणि प्रयोगवह्या वाटण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष संपत आले तरी नव्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण शिक्षकांना न देण्यामागची कारणे काय आहेत, तसेच सोलापूर येथे झालेल्या प्रशिक्षणामध्ये गाईड्स आणि प्रयोगवह्या वाटण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शिक्षकांना नव्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही. प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही. हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षकांची रिक्त पदे असल्याबाबत

**(६८) * १३१२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मंजूर ६ हजार ३२४ पदांपैकी केवळ ३ हजार ९६३ पदे भरली असून, २ हजार ३६१ मंजूर रिक्त पदे असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुऱ्या प्रशिक्षकामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होत असल्याने मागील वर्षापेक्षा यावर्षी आय.टी.आय. प्रवेशाचे प्रमाण कमी झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कौशल्य विकासाचे नवे धोरण स्वीकारण्यासाठी तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्दिष्टाने निदेशकांची पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षकांच्या रिक्त पदांवर तासिका तत्वावर प्रशिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. सन २०१९ वर्षात प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या ९३२२० जागांपैकी ८३२१० जागांवर प्रवेश झालेले आहेत.

(३) व (४) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध मंजूर करण्याबाबतची कार्यवाही वित्त विभागाच्या सल्ल्याने सुरु आहे. आकृतिबंध मंजूर झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. दरम्यानच्या कालावधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील सरळसेवेची रिक्त शिक्षकीय पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ०९/०६/२०१७ अन्वये गठीत उपसमितीसमोर सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण करण्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(६९) * ५६१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयात प्रवेशापूर्वीच जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन राज्य सीईटी सेलच्यावतीने करण्यात आले असून जात पडताळणी प्रमाणपत्र प्रवेशापूर्वी सादर केले तर विद्यार्थ्यांना अडचणी येणार नसल्याचेही सीईटी सेलने सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना प्रवेश पूर्ण करता यावेत यासाठी शासनाने जात पडताळणी प्रमाणपत्र काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी सीईटी सेलने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण करता यावेत यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ चे विविध पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना मागासप्रवर्गातील जागांवर प्रवेश घ्यावयाचा झाल्यास शासन नियमानुसार जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आले असल्याचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेले आहे.

(२) होय, तशा स्वरुपाची विनंती राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) तसेच आदिवासी विभागांतर्गत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस यापूर्वीच केलेली आहे.

(३) व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही त्यांनी ते प्राप्त करण्यासाठी संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र समितीकडे ३१ मार्च, २०२० पर्यंत अर्ज करण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत वृत्तपत्रातून व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या संस्थेच्या संकेत स्थळावरुन जाहीर आवाहन करण्यात आलेले आहे. तसेच १ एप्रिल, २०२० पासून विशेष मोहिम आयोजित करण्यात आलेली आहे.

अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांनी विहित कालमर्यादेत जात प्रमाणपत्राची वैधता तपासून घेणेबाबत आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसटीसी-२११९/प्र.क्र.१७९/का-१०, दिनांक १० डिसेंबर, २०१९ अन्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जमातीचा दावा करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे प्राधान्यक्रमाने तपासून निकाली काढण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अत्याधुनिक वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्रे कार्यान्वित करण्याबाबत

**(७०) * १३०५ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी राज्यभरात रस्ता सुरक्षा सप्ताह सुरु असताना राज्यातील रस्ता सुरक्षेसाठी तरतूद केलेला रुपये १०० कोटींचा निधी विनावापर पडून असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यात एकूण ११ ठिकाणी अत्याधुनिक वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्रे उभारण्यासाठीचा निधी न वापरल्याने राज्यात या केंद्राअभावी अत्याधुनिक वाहन चाचणी बंद पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मुंबईसह राज्यातील अत्याधुनिक वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्रे कार्यान्वित करुन रस्ता सुरक्षेसाठी तरतूद केलेल्या निधीचा वापर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे नाही.

रस्ता सुरक्षा निधीच्या प्रयोजनासाठी परिवहन आयुक्त यांच्या नावे स्वीय प्रपंजी (PLA) उघडण्यात आले असून दिनांक ०४/०१/२०२० अखेर उक्त खात्यात रुपये ६४,७३,७६,८५८/- जमा करण्यात आलेले आहेत. त्यापैकी रुपये २९,६६,८१,७८०/- एवढा निधी खर्ची पडलेला असून दिनांक ३१/०१/२०२० अखेर रुपये ३५,०६,९५,०७७/- इतका निधी उक्त खात्यात शिल्लक आहे.

(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२९५/२०१५ मध्ये रस्ता सुरक्षा विषयक बाबींचा वेळोवेळी आढावा घेऊन मा.सर्वोच्च न्यायालयास अहवाल सादर करण्यासाठी रस्ता सुरक्षा समितीची स्थापना केली आहे. सदर समितीने दिलेल्या निर्देशानुसार रस्ता सुरक्षाविषयक कामकाजासाठी स्वतंत्रपणे रस्ता सुरक्षा निधी निर्माण करण्यात आलेला आहे. त्यानुसार रस्ता सुरक्षेच्या प्रयोजनार्थ विविध प्रस्तावांना मान्यता देण्याकरीता दिनांक १/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "रस्ता सुरक्षा निधी नियंत्रण समिती" स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या दिनांक २४/०४/२०१९ रोजीच्या बैठकीत रुपये १७०.३१ कोटीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली असून त्याप्रमाणे दिनांक २१/०६/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. यामध्ये परिवहन कार्यालयात परिवहन वाहनांची तपासणी करण्यासाठी १० निरीक्षण व परिक्षण केंद्र (I & C Centres) उभारणी करण्यासाठी रुपये १३६.३३ कोटीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रात्र शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ वेतनश्रेणी शिक्षक कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याबाबत

**(७१) * ७२३ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६५ रात्र शाळांना पूर्णवेळ शाळेचा दर्जा देवून रात्र शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ वेतनश्रेणी शिक्षक कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवा-सुविधा, निवृत्तीवेतन, घरभाडे, वाहनभत्ता, स्थानिक पुरक भत्ता लागू करून रात्र शाळेतील कर्मचाऱ्यांचा कार्यभार निश्चित करण्याबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०३/०८/२०१९ रोजी शिक्षण संचालक, अध्यक्ष अभ्यासगट पुणे व सदस्य सचिव, अभ्यासगट मुंबई यांना तसेच दिनांक ०२/१२/२०१९ रोजी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, आयुक्त (शिक्षण), पुणे आणि शिक्षण संचालक, पुणे यांना निवेदन पाठवून त्वरीत कार्यवाही करण्याची विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नियुक्त करण्यात आलेल्या अभ्यासगट समितीची बैठक दिनांक ३०/१२/२०१९ रोजी संपन्न झाली असून या समितीच्या बैठकीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने पाठविलेल्या अहवालाबाबत रात्रशाळा शिक्षक/शिक्षकेतर संघटनेने सहमती दर्शविली असल्यास संघटनेसोबत व लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेवून अहवालावर चर्चा करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) अभ्यासगटाने केलेल्या शिफारशीबाबत शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील शाळांमध्ये सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती पूर्ण करण्याबाबत

**(७२) * ९५६ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील अनेक शाळांमध्ये सातवा वेतन आयोग लागू झाला असून सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती पूर्ण झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.अनिल सोनावणे, अधीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांनी वेतन निश्चितीसाठी शिक्षकांकडे पैसे मागितल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(३) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी याचे वेतननिश्चितीसाठी वॉर्डनिहाय शिबिराचे आयोजन करण्यात येवून सातव्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती करून देण्यात आलेली आहे. उर्वरित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची वेतननिश्चिती करण्याची कार्यवाही शिघ्रगतीने सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील पर्यटनस्थळाच्या विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७३) * २३५० डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात एकूण ३२ "क" श्रेणी पर्यटनस्थळे असून सदर पर्यटनस्थळांना १४ वर्षापासून निधी मिळत नसल्याने निधीअभावी पर्यटनस्थळांचा विकास प्रलंबित असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील संस्कृती दर्शविणाऱ्या प्राचीन वास्तू, पवित्र धार्मिक ऐतिहासिक, पुरातात्विक महत्वाच्या स्थळांची देखभाल, दुरुस्तीअभावी दुरवस्था झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे पर्यटन स्थळाची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भंडारा जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या विकासाकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही.

भंडारा जिल्ह्यामध्ये एकूण १८ "क" वर्ग पर्यटनस्थळे असून प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत आणि जिल्हा वार्षिक योजनेमधून भंडारा जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा नियमितपणे विकास करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) भंडारा जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ या कालावधीमध्ये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत रुपये ७४२.०६ लक्ष तर "क" वर्ग पर्यटनस्थळ विकास योजना आणि वन पर्यटन विकास योजना या दोन योजनेमधून रुपये ७२३.९१ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधीमधून भंडारा जिल्ह्यातील

पर्यटनस्थळांच्या ठिकाणी पोहोच रस्ते, प्रसाधनगृहे, संरक्षण भिंत, पेव्हर ब्लॉक, पदपथ, बगीचा विकास, वाहनतळ, अंतर्गत रस्ते, पथदिवे इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.